शेजारीण : आमच्याकडे शुक्रवारी हळदीकुंकू आहे, त्यासाठी तुम्हाला बोलवायला आले होते. हळदीकुंकू म्हणजे काय तुम्हाला माहीत आहे ना ?	We're having a ***haldikunkoo*** at our place on Friday, and I've come to invite you for that. You know what a ***haldikunkoo*** is, don't you ?
विद्यार्थिनी : थोडं थोडं माहीत आहे.	I've got some idea.
शेजारीण : मग ह्या निमित्ताने तुम्हाला बघायला मिळेल. याल ना ?	Then this will give you a chance to see one. You'll come won't you ?
विद्यार्थिनी : येईन की. पण तुम्ही कुठे राहाता ते सांगितलं नाहीत. आणि तुमचं नाव सुद्धा.	I'll come. But you haven't told me where you live. Or your name either.

(*Cont.*)

शेजारीण : अरे हो, विसरलेच की. माझं नाव मृदुला भावे. ह्याच्या मागल्या गलीत राहाते. घरावर पाटी आहे कृ. वि. भावे म्हणून.	Oh dear, I forgot to. My name is Mrudula Bhave. I live in the lane behind this one. There's a nameplate 'K. V. Bhave' on the house.
विद्यार्थिनी : सापडेल मला.	I'll find it.
शेजारीण : याल ना मग ? संध्याकाळी सहा ते आठ वेळ ठेवलीय.	Then you will come ? It's set for six to eight in the evening.
विद्यार्थिनी : जरूर येईन.	I'll definitely be there.

PRACTICE

A. Translate the following sentences into Marathi.

1. May I come in ?
2. I'll have coffee.
3. I don't want anything.
4. I've just had tea.
5. This is _____ speaking.[1]
6. What're you doing ?
7. Let's go for a walk.
8. What time ?
9. I don't have any time tomorrow.
10. I'll certainly come.
11. Well, I'd better be going.

B. You have just been served tea. Respond to the following questions from your host / hostess.

१. आणखी दूध घालू का ?
२. साखर देऊ का ?
३. अमेरिकेत असाच चहा पितात का ?

[1] Insert your own name.

C. Phone your friend and

1. invite him / her to a party.
2. suggest you go to a recital.
3. ask him to come along to Pune.
4. invite him / her to your brother's wedding.

The friend should respond in various ways, accepting or declining the invitation, asking for more information, etc.

Additional practice

Kavadi and Southworth, conversations 6 a–b, 7b, 10a, 18 a–b, 22 a–b, 23 a–b, 24 a–b

Three

LANGUAGE

CLASSROOM EXPRESSIONS

आता आपण सुरू करूया.	Let's begin now.
ऐका.	Listen.
म्हणा.	Say.
आता तुम्ही म्हणा.	Now you say it.
सगळ्यांनी मिळून म्हणा.	Everybody say it together.
तुम्हाला समजलं का ?	Did you understand ?
हो, समजलं.	Yes, I understood.
अजून समजलं नाही.	I still haven't understood.
पुन्हा सांगा.	Please tell (me) again.
लिहून दाखवा.	Please write it (for me).
मी एक प्रश्न विचारू का ?	May I ask a question ?
हो, विचारा की.	Certainly.
ह्याचा अर्थ काय ?	What is the meaning of this ?
_____ म्हणजे काय ?	What does _____ mean ?
स्पष्ट उच्चार करा.	Speak distinctly (' make clear pronunciations ').
बरोबर आहे.	That's right.
बरोबर नाहीये.	That's not right.
चुकलं.	That's incorrect.

What Do You Call This in Marathi?

The first speaker points at his hand.

मराठीत ह्याला काय म्हणतात?	What is this called in Marathi?
ह्याला हात म्हणतात.	This is called हात.
तो हात?	तो हात? (i.e., does it take the masculine demonstrative?)
हो, तो हात.	Yes, तो हात.
एक हात, दोन . . .	One हात, two . . .
हात.	हात.
हात हा शब्द पुल्लिंगी आहे का?	Is the word हात masculine?
हो.	Yes.
हात ह्या शब्दाचं अनेकवचन काय आहे?	What is the plural of the word हात?
हात.	हात.

The first speaker points to his finger.

ह्याला काय म्हणतात?	What do you call this?
बोट.	बोट.
तो बोट?	तो बोट?

(Cont.)

नाही, ते बोट.	No, ते बोट.
एक बोट, पाच . . .	One बोट, five . . .
बोटं.	बोटं.
मराठीत 'tongue' ला काय म्हणतात ?	In Marathi how do you say 'tongue' ?
जीभ म्हणतात.	We say जीभ.
ते जीभ ?	ते जीभ ?
नाही, ती जीभ.	No, ती जीभ.
जीभ हा शब्द नपुसकलिंगी आहे का ?	Is the word जीभ neuter ?
नाही, स्त्रीलिंगी.	No, it's feminine.
मराठीत 'knee' कसं म्हणायचं ?	In Marathi how do you say 'knee' ?
गुडघा.	गुडघा.
माझ्या लक्षात अजून आलं नाही. परत म्हणा.	I still haven't got it. Say it again.

What Does This Word Mean?

सोपं म्हणजे काय ?	What does सोपं mean ?
सोपं म्हणजे 'easy.'	सोपं means 'easy.'
अवघड म्हणजे काय ?	What does अवघड mean ?
अवघड म्हणजे 'hard.'	अवघड means 'hard.'
म्हणजे 'टेबल अवघड आहे' असं म्हणता येतं का ?	You mean you can say 'the table is अवघड ?'
नाही, टेबल कठीण आहे. काम अवघड आहे. अवघड म्हणजे 'difficult.'	No, 'the table is कठीण.' Work is अवघड. अवघड means 'difficult.'
पण कठीण हा शब्द दोन्ही अर्थी वापरता येतो. म्हणजे काम कठीण आहे असंही म्हणता येतं.	But we can use the word कठीण in both senses. That is, we can also say 'the work is कठीण.'
अवघड हा शब्द लिहून दाखवा.	Please write ('write and show') the word अवघड.
दाखवतो / दाखवते.	All right.
अवघड हया शब्दात गणपतीतला ग आहे का ?	Is the *g* in अवघड the one that's in the word गणपती ?
नाही, घरातला घ.	No, the one that's in घर.
आणि डमरूतला ड आहे का ?	And the *d* is the one that's in डमरू ?
हो.	Yes.

हा शब्द मला कळत नाही. म्हणून दाखवा.	I don't understand this word. Please pronounce it.
वाङ्मय.	वाङ्मय.
ह्याचा अर्थ काय ?	What does it mean (' what is its meaning ')?
लिटरेचर.	Literature.
म्हणून ह्या शब्दाचा उच्चार तुम्ही बरोबर करीत नाही. त्यात बाणातला ण आहे, नळातला नव्हे. परत म्हणा.	You don't pronounce the word म्हणून correctly. It has the *n* in बाण, not the one in नळ. Say it again.
म्हणून.	म्हणून.
आता बरोबर आला.	Now it's right ('came right').
ल आणि ळ ह्या दोन उच्चारांतला फरक मला कळत नाही. तुम्ही म्हणून दाखवा.	I don't get the difference between the sounds ल and ळ. Would you please say them for me?
ल ळ	ल ळ
कल कळ	कल कळ
कल कळ	कल कळ
आता लक्षात आलं का ?	Do you get it now ?
हो असं वाटतं तरी.	Yes, I think so.
आता तुम्ही म्हणा — कल कळ.	Now you say कल कळ.

What Is That Man Doing?

The speakers are watching a man carding cotton.

तो माणूस काय करतोय ?	What is that man doing ?
तो कापूस पिंजतोय.	He is carding cotton.
म्हणजे पिंजणं असा शब्द आहे का ?	That is, the word is पिंजणं ![1]
हो बरोबर आहे.	Yes, that's right,

The second speaker is rolling out chapatis.

तुम्ही काय करताय ?	What are you doing ?
मी पोळ्या करतोय / करत्येय.	I am making chapatis.
ते माहीत आहे पण पोळ्या करण्याच्या क्रियेला काय म्हणतात ?	I know that, but what is the action of making chapatis called ?
लाटणं म्हणतात.	It's called लाटणं.

The speakers are watching some women weeding.

त्या बायका काय करतायत ?	What are those women doing ?
त्या गवत काढतायत.	They're weeding.
ते समजलं, पण ह्या क्रियेला खास शब्द असेल.	That I know, but there must be a special word for this action.
त्याला खुरपणी म्हणतात.	It's called खुरपणी.

(Cont.)

म्हणजे बायका खुरपणी करतायत असं म्हणता येतं का ?	That is, you can say ' the women are doing खुरपणी ' ?
हो, नाही तर बायका खुरपतायत.	Yes, or you can use it directly as a verb.

Note

[1]The speakers in the first two conversations follow the usual practice of giving verbs in the citation form, i.e., with the base plus णे. In our vocabulary, however, we give only the base form.

PRACTICE

A. Ask the meaning of the following words. In the case of nouns ask also about the gender and plural forms.

१. पुस्तक	११. ऐक–
२. घर	१२. तुम्ही
३. गाडी	१३. मी
४. मैत्रीण	१४. माझं
५. झाड	१५. आमचं
६. खुर्ची	१६. कोण
७. जा–	१७. किती
८. ये–	१८. काय
९. बोल–	१९. कधी
१०. समज–	२०. केवढं

B. Ask how to say the following nouns in Marathi. Ask also about the gender and plural form of each. (Note that a few of these nouns do not have plurals.)

1. bird
2. animal
3. sky
4. cloud
5. rain
6. flower
7. hill
8. mountain
9. river
10. field
11. door
12. window
13. stairway
14. pen
15. paper
16. notebook
17. comb
18. matchbox
19. glasses
20. mirror

C. Ask how to say the following verbs in Marathi.

1. to get up
2. to work
3. to study
4. to play
5. to eat
6. to drink
7. to sleep
8. to see
9. to hear
10. to go
11. to come
12. to live
13. to be
14. to read
15. to write
16. to learn
17. to teach
18. to ask
19. to take
20. to give

D. Take any page of the illustrated vocabulary and ask the Marathi equivalent for each item or action pictured.

Additional practice

Kavadi and Southworth, conversations 27 a-c, 28 a-b, 29

Four

GETTING AROUND

Where Is Mr. Patil's House ?

पाटील साहेबांचं घर कुठे आहे ?	Where is Mr. Patil's house ?
कोण पाटील ?	Which Patil ?
व्ही. के. पाटील.	V. K. Patil.
म्हणजे कॉंट्रॅक्टर ?	You mean the contractor ?
हो.	Yes.
इथेच. दवाखान्यासमोर.	Right here. In front of the dispensary.
पाटील साहेब कुठे राहतात ?	Where does Mr. Patil live ?
कुठले पाटील पाहिजेत ?	Which Patil do you want ?
पाटील कॉंट्रॅक्टर.	Contractor Patil.
ते होय ? इथंच. दवाखान्यासमोर राहातात.	Oh him ? Right here. He lives in front of the dispensary.
पाटील कॉंट्रॅक्टरांचं घर कुठे आहे ?	Where is contractor Patil's house ?
दवाखान्यासमोर ती माडी आहे नं, तीच त्यांची.	You see that tall building in front of the dispensary ? That's his house.

Where Is the Market ?

मंडईला कुठून जायचं ?	How do you go to the vegetable market ?
हया रोडनी असं सरळ जा, मग एक देऊळ लागेल. तिथे डावीकडे वळलं की लगेच मंडई दिसेल.	Go straight along this road. Then you will come across a temple. As soon as you turn left there you will see the vegetable market.
मंडई कुठे आहे ?	Where is the market ?
हया रस्त्यानं सरळ देवळापर्यंत जा. देवळाशी डावीकडे वळलं की समोरच मंडई आहे.	Go straight along this road up to the temple. When you turn left at the temple the market is right in front of you.
मंडई कुठे आहे ?	Where is the market ?
इथून जवळच आहे.	It's right nearby.
तिथे कसं जायचं ?	How should I go there ?
ते देऊळ दिसतं नं, तिथपर्यंत जा. मग डावीकडे वळा, की मंडई दिसेलच तुम्हाला.	You see that temple of the goddess, don't you ? Go up to there. Then turn left and you'll see the market.

Where Do You Want To Go?

Conversations with a rickshaw driver

कुठे जायचं ?	Where do you want to go ?
महात्मा गांधी रोड.	Mahatma Gandhi Road.
बाहेरनं घेऊ का ?	Shall I take the outside route ?
चालेल.	All right.
कुठे जायचं तुम्हाला ?	Where do you want to go ?
पुणे स्टेशन.	Pune Station.
सिटीमधनं घेऊ का ?	Shall I go through the city ?
नको, रहदारी जास्त आहे. बाहेरनं घ्या.	No, there's too much traffic. Take the outside route.
रिक्षा मोकळी आहे का ?	Is your rickshaw free ?
नाही, एंगेज्ड आहे.	No, it's engaged.
गाडी खाली आहे का ?	Is your rickshaw free ?
हो आहे. कुठे जायचंय ?	Yes it is. Where do you want to go ?
युनिव्हर्सिटी.	The university.
इतकं लांब मला जाता येणार नाही. गाडी परत द्यायची वेळ झाली आहे.	I can't go so far. It's time for me to return the rickshaw.

Drive Slow

Conversations with a rickshaw driver

हळू चालवा.	Drive slow.
घाबरू नका. मला कधी ॲक्सिडेंट झाला नाही.	Don't be afraid. I've never had an accident.
तरी तुम्ही हळू चालवा. नाही तर मी आत्ताच उतरून जातो / जाते.	Even so, drive slowly. Otherwise I'm going to get out right now.
जपून चालवा. पुढे जास्त खड्डे आहेत.	Drive carefully. There are a lot of pot–holes ahead.
तुम्ही आरामशीर बसा. मी व्यवस्थित नेतो.	Sit back and relax. I'll take it carefully (' properly ').

Rickshaw suddenly stops.

काय झालं ?	What happened ?
कुठेतरी कचरा अडकलाय. काळजी करू नका. दोन मिनिटांत चालू होईल.	Some dirt's gotten stuck somewhere. Don't worry. It'll start in two minutes.
काय झालं ?	What happened ?
शॅफ्ट तुटलाय. तुम्ही बसा. मी दुसरी गाडी बघून देतो.	The shaft has oroken. You sit here. I'll get you another rickshaw.

तुम्ही कुठे चालल्राय ?	Where are you going ?
पेट्रोल संपत आल्य. ह्या पंपावर घेतो.	My gas is almost finished. I'll get some at this gas station.

Here's Your Fare

Conversations with a rickshaw driver

हे घ्या चार रुपये.	Here's your four rupees ('take four rupees').
आणखी एक रुपया वीस पैसे द्या.	Give me one rupee twenty paise more.
असं कसं ? मीटरवर चार रुपये आहे.	What do you mean ? The meter says four rupees.
बरोबर आहे. पण आता नवीन टॅरीफ आहे. त्याप्रमाणे जादा पैसे होतात.	That's right, but there's a new tariff now. According to that there's an extra charge.
हे घ्या पैसे.	Here's your fare.
सुटे पैसे नाहीत का ?	Don't you have any change ?
नाही, अजिबात नाहीत.	No, none at all.
मग द्या. मी दुकानातून मोड आणतो.	Then give it here. I'll bring change from a store.
माझी कॅम्पमध्ये चार-पाच कामं आहेत. तुम्हाला प्रत्येक ठिकाणी थोडा वेळ थांबावं लागेल. चालेल ना ?	I have four or five jobs in the Camp. You'll have to stop at each place for a while. Is that OK ?

(Cont.)

नाही, वेटिंग आम्हाला परवडत नाही. शिवाय ही धंद्याची वेळ आहे.	No, we don't make anything on the waiting charge (' we can't afford waiting '). Besides this is the busiest time (' this is the time for business').
मी तुमच्या वेटिंगसाठी आणखी पैसे देईन.	I'll give you something extra for waiting.
बरं चला. पण जास्त वेळ घेऊ नका.	Well, all right. Go ahead. But don't take too much time.
हे घ्या.	Here you are.
आणखी एक रुपया द्या.	Give me one more rupee.
आणखी एक रुपया कसला ? चार रुपये ऐंशी पैसेच झालेत.	What do you mean one more rupee ? It's come to just four rupees and eighty paise.
लगेज चार्ज वेगळा असतो साहेब / बाई.	The luggage charge is extra (' separate '), saheb/bai.
औंध रोडला जायचंय.	I want to go to Aundh Road.
बारा रुपये पडतील.	It'll cost twelve rupees.
मीटरवर होतील तेवढे देईन.	I'll pay whatever is on the meter.
फार लांब जायचंय साहेब / बाई. पुन्हा रिकामं परत यावं लागेल.	We have to go very far, saheb/bai. Besides I'll have to come back empty.

(Cont.)

माडं मिळेल की तुम्हाला तिथून. मी मीटरप्रमाणे देईन, जास्त नाही.	You'll get another fare from there. I'll pay you according to the meter, no more.
मग तुम्ही दुसरी गाडी बघा.	Then you look for another rickshaw.
साखर कारखान्याला घ्या.	Take me to the sugar factory.
तिथे तुम्हाला सोडायचंय की थांबायचंय ?	Am I to drop you there or to wait ?
सोडायचंय.	Drop me.
सात रुपये होतील.	That will be seven rupees.
मीटरप्रमाणे काय होईल ते घ्या.	Charge me whatever the meter shows.
इथं पुण्यासारखा मीटर-बीटर नसतो.	Here we don't go according to the meter like in Pune (' here there isn't a meter or anything like in Pune ').
बरं बाबा, चला.	All right. Let's go.

Can I Rent a Bike ?

सायकल भाड्यानं मिळेल का ?	Is a bike available here on rent ?
हो मिळेल की. किती दिवसांसाठी पाहिजे ?	Yes it is. How long do you want it for ?
सहा महिने.	For six months.
भाडं साठ रुपये महिना पडेल.	The rent will be sixty rupees a month.
ॲडव्हान्स किती द्यावा लागेल ?	How much will I have to pay as an advance ?
सगळेच पैसे द्यायला लागतील.	You will have to give the full amount.
तुम्ही सायकली भाड्यानी देता का ?	Do you give bicycles on hire ?
हो देतो.	Yes we do.
एक लेडीज सायकल मिळेल का ?	Can I get a lady's bicycle ?
आत्ता माझ्याजवळ नाही, पण आणता येईल. किती दिवसांसाठी पाहिजे ?	I don't have one right now but I can bring one. How long do you want it for ?
एक महिन्यासाठी. भाडं किती पडेल ? साठ रुपये.	One month. What is the rent ? Sixty rupees.

(Cont.)

सायकल चांगली आहे का ?	Is the bike a good one ?
हो, फर्स्ट क्लास.	Yes, first class.
ही सायकल फार जुनी आहे. नवी सायकल नाहीये का तुमच्याकडे ?	This bicycle is very old. Don't you have a new one ?
आत्ता नाहीये. पण दोन-तीन दिवसांनी मिळेल. चालेल का ?	Not right now. But I can get one in two or three days. Will that be OK ?
हो, चालेल की.	Yes that will be OK.
सायकल नादुरुस्त झाली तर ?	What if the bike needs repairs ?
इथे आणा. आम्ही दुरुस्त करून देऊ.	Bring it here. We'll fix it.
आणि दुरुस्तीचा खर्च ?	And the cost of repair ?
तो आमच्याकडे.	That's on us.
आणि समजा, सायकल चोरीला गेली तर ?	And suppose the bike is stolen ?
ती जबाबदारी तुमची.	That responsibility is yours.
मग कुलूप असायला पाहिजे.	Then there had better be a lock.
बरं, मी टाकतो.	All right, I'll put one on.

Where Can I Get the Bus?

जिमखान्यावर जायला इथे बस मिळेल का ?	Can I get a bus here to go to Deccan Gymkhana [1]?
हो, मिळेल की. पाच नंबर.	Yes you can. Number five.
बस कधी सुटते ?	When will the bus start ?
दर तासानी सुटते.	There's a bus every hour.
कोथरूडला जाणारी बस कुठे मिळेल ?	Where can I get the bus to Kothrud ?
तिकडच्या स्टॉपवर.	At that stop.
कुठल्या नंबरची ?	What number bus ?
बारा.	Twelve.

(*at the bus terminal*)

स्टेशनवर जाणारी गाडी कुठे लागते ?	Where does the bus for the station leave from ?
प्लॅटफॉर्म नंबर तीनवर.	Platform number three.
किती वाजता येते ?	What time does it come ?
येईलच आता, पण रांग बरीच लांब आहे. हया गाडीत तुम्हाला बहुतेक जागा मिळायची नाही.	It'll come now, but the queue is very long. You probably won't get a place on this bus.

(Cont.)

नाही मिळाली तर पुढची गाडी किती वेळानी येते ?	If I don't how long is it until the next bus comes (' in how much time does the next bus come ')?
एक तासानी.	In an hour.
तुमच्याकडे यायला बस मिळेल का ?	Can I get a bus to come to your place ?
हो, मिळेल की. डेक्कन जिमखान्याच्या स्टँडवर अकरा नंबरची बस घेऊन मोदी गणपती स्टॉपवर उतरा.	Sure you can. Take bus number eleven from the Deccan Gymkhana stand and get off at Modi Ganpati stop.

The conductor comes to collect the fare.

मोदी गणपती स्टॉप.	Modi Ganpati stop.
चाळीस पैसे.	Forty paise.
स्टॉप आला की मला सांगा.	Tell me when we get to the stop ('when the stop comes').
बरं.	OK.

Note

[1] In Marathi Deccan Gymkhana (a section of Pune) is referred to simply as जिमखाना.

✣

Finding an Address (1)

A passenger sits in a rickshaw and gives directions to the driver.

सदाशिव पेठेत घ्या.	Take me to Sadashiv Peth.
सदाशिव पेठेत कुठंशी ?	Whereabouts in Sadashiv Peth ?
तीनशेचेचाळीस सदाशिव असा पत्ता आहे.	The address is 342 Sadashiv.
रस्ता, चौक असं काही सांगा, नंबर कुठे शोधायचा ?	Tell me the street, intersection or some such thing. How am I going to look for a number ?
जय बजरंग तालमीजवळ असं लिहिलंय.	It says near Jay Bajrang Talim.[1]
असं बोला. जय बजरंग तालीम माहिती आहे आपल्याला.	That's more like it (' speak like that '). I know the Jay Bajrang Talim.

(after a while)

ही तुमची तालीम.	Here's your *talim*.
किती झालं भाडं ?	How much is the fare ?
दोन रुपये पंचेचाळीस पैसे.	Two rupees and forty–five paise.

The passenger gets out to look for the house.

तीनशेबेचाळीस सदाशिव कुठं आला हो ?	Excuse me, where is 342 Sadashiv ?
आता ते कुणाला ठाऊक ? कुणाला भेटायचंय तुम्हाला ?	Who knows ? Who do you want to meet ?
ठाकूर. ठाकूर वकील.	Thakur, the one who's a lawyer.
मग तो पलिकडला वाडा. तिथं चौकशी करा आत जाऊन.	Then it's that *wada* over there. Go inside and inquire.

Note

[1] A *talim* is a gymnasium for wrestling and body-building.

✣

Finding an Address (2)

A passenger alights from a rickshaw and looks around. He speaks to a passerby.

पाचशे त्र्याण्णव बुधवार इथेच आला ना ?	Is 593 Budhwar Peth right around here ?
कुणाला ठाऊक ? हा इथे तीनशेवीस आहे. जरा पुढे जाऊन बघा.	God knows. This is 320. Go look a little further on.

He goes some distance and speaks to another passerby.

कोण पाहिजे तुम्हाला ?	Who do you want ?
आजगावकर.	Ajgaonkar.
अशा नावाचं कुणी इथे राहात नाही.	There's no one by that name living here.
असं कसं होईल ? त्यांनी मला हाच पत्ता दिला होता.	How can that be ? He gave me this address.
काय करतात ते ?	What does he do ?
वाद्यं बनवतात, त्यांची दुरुस्ती वगैरे करतात.	He makes musical instruments and repairs them.
हां, मग त्या पलिकडच्या गल्लीत असतील कदाचित. तिथे दोन-तीन वाद्यांची दुकानं आहेत.	Ah, then he's perhaps in the next lane. There are two or three shops selling musical instruments there.

(Cont.)

पण मग पत्ता असा कसा चुकीचा दिला त्यांनी ?	But how come he gave me the wrong address ?
घर नंबर दिलाय ना ? मग तो नवा असेल. आता नंबर बदलल्येत इथे सगळे.	He gave the house number, eh ? Then it must be the new number. All the numbers have changed around here.

He returns to the rickshaw.

छान, म्हणजे हाही घोटाळा आहे. कसा एखादा पत्ता सापडायचा माणसाला ?	Great, now this mix-up too. How is a person supposed to find an address ?

PRACTICE

A. Translate the following sentences into Marathi.

1. Where is Mr. Kulkarni's house ?
2. Where does Surekhabai Bapat live ?
3. Where is the high school ?
4. Go straight.
5. Turn left.
6. Turn right.
7. Is your rickshaw free ?
8. I want to go to the station.
9. Drive slow.
10. Stop here.
11. Here's your fare.
12. Is a rented bike available here ?
13. Can I get a bus here to go to Mahatma Gandhi Road ?

14. What time does the bus come?
15. Tell me when we get to the stop.

B. Practice asking and giving directions to places in your neighborhood.

C. Sketch the map of an imaginary Maharashtrian town or village, and practice asking and giving directions to various places. See the illustrated vocabulary for suggestions as to what places to include in the town.

Additional practice

Kavadi and Southworth, conversations 8 a–b, 14 b

Five

SHOPPING

How Much Are the Mangoes?

आंबे कसे दिले ?	How much are the mangoes ?
बावीस रुपये डझन.	Twenty–two rupees a dozen.
बावीस रुपये डझन ! बापरे, फार महाग आहेत.	Twenty-two rupees a dozen ! Heavens, they're very expensive.
हे हापूस आहेत, साहेब / बाई . तुम्ही कुठेही विचारा. हापूस ह्याच्यापेक्षा स्वस्त मिळणार नाहीत तुम्हाला.	These are Alphonso mangoes, saheb / bai. Ask anywhere. You are not going to find Alphonso cheaper than this.
बावीस रुपये फार झाले. वीस रुपयाला द्या.	Twenty–two rupees is too much. Give them for twenty rupees.
बरं घ्या. किती देऊ ?	All right. How many shall I give you ?
अर्धा डझन.	Half a dozen.

सफरचंदं कशी दिली ?	How much are the apples ?
दोन रुपये पावशेर.[1]	Two rupees a quarter kilo.
थोडा भाव कमी करा की, मी एकदम एक किलो घेतो / घेते.	Reduce the price a little. I'll take a whole kilo at one time.
बरं, सात रुपयाला घ्या आठऐवजी.	All right, take them for seven rupees instead of eight.

केळी कशी ?
How much are the bananas ?

दोन रुपये डझन.
Two rupees a dozen.

सहा द्या.
Give me six.

तयार पाहिजेत का ?
Do you want ripe ones ?

नको. जराशी कच्ची पाहिजेत.
No, I want them slightly green.

संत्री कशी दिली ?
How much are the oranges[a] ?

पंधरा रुपये डझन.
Fifteen rupees a dozen.

फारच महाग आहेत.
They are very expensive.

ही नागपूरची संत्री आहेत, साहेब / बाई. फार गोड आहेत. तुम्ही खाऊन बघा.
These are Nagpur oranges, saheb / bai. They're very sweet. Try one and see (' eat and see ').

आहेत खरी गोड. बरं, मी एक डझन घेतो / घेते. पण निवडून घेणार हं.
They really *are* sweet. All right, I'll take one dozen. But I am going to select them (myself).

तुम्ही काळजी करू नका. मी तुम्हाला खराब माल देणार नाही.
Don't you worry. I won't give you rotten stuff.

मोसंबी कशी ?
How much are the oranges ?

रुपयाला एक.
A rupee each.

फार महाग आहेत. नको मला.
They're too expensive. I don't want any.

पण हा जुना बहार आहे, साहेब / बाई. फार गोड आहे खायला.
But this is old stock (' crop '), saheb/bai. They're very sweet to eat.

(Cont.)

गोड असली म्हणून काय झालं ? इतकी महाग नको मला.	So what if they're sweet ? I don't want anything so expensive.

Notes

[1]शेर is an old measure. In rural areas the word is often used as the equivalent of किलो.

[2]संत्री are loose-skinned oranges, similar to tangerines. मोसंबी, which are similar to American oranges, are often called 'sweet limes' in India.

Did You Get Any Mangoes?

आंबे मिळाले का?	Did you get any mangoes?
हो, मिळाले.	Yes, I did.
कसे?	For how much?
बावीस रुपये डझन.	Twenty-two rupees a dozen.
केळी आणलीत का?	Did you bring the bananas?
हो, आणली.	Yes, I did.
कशी मिळाली?	How much were they?
दोन रुपये डझन.	Two rupees a dozen.
पेरू मिळाले का?	Did you get some guavas?
नाही मिळाले. बाजारात होते पण ताजे नव्हते.	No, I didn't. There were some in the market, but they weren't fresh.
मोसंबी मिळाली का?	Did you get the oranges?
नाही मिळाली. बाजारात होती पण खूप महाग होती.	No, I didn't. There were some in the market, but they were very expensive.
कशी होती?	How much were they?
दोन रुपयाला एक.	Two rupees apiece.

सफरचंदं मिळाली का ?	Did you get some apples ?
हो, मिळाली.	Yes, I did.
कशी ?	How much were they ?
दहा रुपये किलो. जरा महाग आहेत पण चांगली आहेत.	Ten rupees a kilo. They're rather expensive, but they're nice.

I Want a Ballpoint Pen

मला बॉलपेन पाहिजेय.	I want a ballpoint pen.
कसलं पाहिजे — असलं रिट्रॅक्टेबल पाहिजे का ?	What kind do you want — a retractable one like this ?
नको, साधं द्या.	No, give me a plain one.
हे चालेल का ?	Will this do ?
ह्याची काय किंमत ?	What is the price of this ?
दोन रुपये.	Two rupees.
ठीक आहे. हे घेतो / घेते.	Fine. I'll take it.
मला बॉलपेनं दाखवा.	Would you show me some ballpoint pens ?
कसली दाखवू ?	What kind shall I show you ?
पेन्सिलसारखी लांब असतात ना— तसली.	The kind that are long, like pencils.
म्हणजे असलं ?	You mean like this ?
हो, असलंच. हे केवढ्याला ?	Yes, that's just the kind. How much is this ?
सव्वादोन रुपये. किती देऊ ?	Two twenty–five. How many shall I give ?
तीन.	Three.

आणखी काय पाहिजे ?	What else would you like ?
आखीव कागद द्या—चार दस्ते.	Give me some ruled paper—four
चांगल्या क्वॉलिटीचा द्या, बरं का.	quires.[1] Be sure and give me
नाहीतर शाई फुटते.	a good quality. Otherwise the ink spreads.
आणखी काही पाहिजे का ?	Would you like anything else ?
रबर बँडचा पुडा आणि पेपर क्लिप्सची	Give me a packet of rubber
एक बॉक्स द्या.	bands and a box of paper clips.
आणखी काही पाहिजे का ?	Would you like anything else ?
नाही, आणखी काही नको.	No, I don't want anything else.

Note

[1] A quire is twenty-four sheets of paper.

I Want Some Material for a Kurta

तुम्हाला काय पाहिजे ?	What would you like ?
मला खादीचं कापड पाहिजे.	I want some khadi material.
कशासाठी ?	What for ?
कुडत्यासाठी.	For a kurta.
पांढरं की रंगीत हवं ?	Do you want white or colored ?
रंगीत.	Colored.
हे बघा. हे अगदी फाइन आहे.	Look at this. It's very fine.
ह्याच्यापेक्षा जाड हवं असलं तरी मिळेल.	If you want a thicker material, that's also available.
हे कसं मीटर ?	How much is it a meter ?
पंधरा रुपये मीटर. आणि डिझाइनवालं हवं असलं तर हे बघा. ह्यात चार रंग आहेत.	Fifteen rupees a meter. And if you want a print look at this. There are four colors in this.
कुडत्यासाठी कापड दाखवा हो.	Please show me material for a kurta.
प्लेन की डिझाइनचं ?	Plain or printed ?
दोन्ही तऱ्हेचं दाखवा.	Show me both kinds.
हे बघा, भारी पॉपलिन आहे.	Look at this. It's a fine quality poplin.

(Cont.)

मिलचं नको, हँडलूमचं असलं तर बघू.	I don't want mill cloth. If you have handloom let me see it.
हे बघा.	Look at this.
चांगला ब्राइट रंग नाही का ? हा मजीद दिसतो अगदी.	Don't you have a nice bright color ? This looks very dull.
मग हे चौकटीचं घ्या. त्यात तीन-चार रंग मिळतील.	Then take this check. There are three or four colors available in that.
पन्हा किती ?	What is the width ?
छत्तीस इंच.	Thirty-six inches.
बरं, हे द्या जांभळं, सव्वादोन मीटर.	All right, give me this purple, two and a quarter meters.
हे बघा (तागा उलगडायला लागतो).	Look at this (*starts to unroll bolt*).
उलगडण्याची गरज नाही. कापड चांगलं आहे पण दुसरा रंग नाहीये का ?	There's no need to unroll it. The material is nice, but don't you have another color ?
आहे की. निळं आहे, गुलाबी आहे.	Yes certainly. We have blue and we have pink.
ह्याचा दर काय ?	How much is this (' what is the rate for this ') ?
तीस रुपये मीटर.	Thirty rupees a meter.
जरा महाग आहे. ह्याच्यापेक्षा थोडंसं स्वस्त दाखवा.	It's rather expensive. Please show me something a little cheaper.

(*Cont.*)

हे खरं तितकं महाग नाही. ह्याचा पन्हा मोठा असल्यामुळे कापड कमी लागतं.	This isn't actually so expensive. Since it's wide you need less of it.
कुडता शिवायला मला किती कापड लागेल ?	How much material will I need to make (' sew ') a kurta ?
लांबी किती पाहिजे ?	How long (' how much length ') do you want it ?
इथपर्यन्त.	Up to here.
लांब बाहधा पाहिजेत का ?	Do you want long sleeves ?
नाही, आखूड.	No, short.
मग दोन मीटर बास होईल.	Then two meters will be enough.
कापड छान आहे. कुठे मिळालं ?	This material is very nice. Where did you get it ?
लक्ष्मी रोडवरच्या खादी भांडारामधे.	In the Khadi Bhandar on Laxmi Road.
केवढ्याला मिळालं ?	How much was it ?
चौदा रुपये मीटर.	Fourteen rupees a meter.

I Want To Get a Shirt

मला शर्ट घ्यायचाय. कुठे मिळेल ?	I want to get a shirt. Where can I get one ?
कुठल्याही रेडिमेड कपड्यांच्या दुकानात मिळेल. मी आज दुपारी मेन स्ट्रीटवर जाणाराय. तू माझ्याबरोबर येत असलास तर मी तुला एक दुकान दाखवतो / दाखवते.	You'll get one in any ready-made clothing store. This afternoon I'm going to Main Street. If you come with me I'll show you a shop.
चालेल.	OK.
या, काय हवं ?	Come in, what would you like ?
बुश शर्ट घ्यायचाय.	I want to get a bush shirt.
प्लेन की डिझाइनवाला ?	Plain or printed ?
पट्ट्यांचं डिझाइन असलेला आहे का ?	Do you have one with stripes ?
हो आहे की. हा बघा.	Yes we do. Look at this.
बरा आहे, पण हा रंग मला नाही आवडत.	It's all right, but I don't like this color.
ह्याच्यात आणखी तीन-चार रंग आहेत. हे बघा.	There are three or four more colors in this. Look at these.
हा पिवळा छान आहे. ह्याची काय किंमत आहे ?	This yellow one is nice. What is the price ?

(Cont.)

पन्नास रुपये.	Fifty rupees.
माझ्यासाठी कोणता साईझ लागेल ?	What size will I need for myself ?
अडतीस लागेल.	You will need thirty-eight.

✣

I Want a Pair of Chappals

माझ्या पायाची चप्पल पाहिजे.	I want a pair of chappals for myself.
ही बघा.	Look at these.
असली रबरी नको. चामड्याची दाखवा.	I don't want rubber ones like that. Show me some leather ones.
मग ही चालेल का ?	Then will these do ?
हो, पण हयात काही वेगळी डिझाइन्स नाहीत का ?	Yes, but don't you have any other designs ?
नाही.	No.
मग असलीच काळ्या रंगात मिळेल का ?	Then can I get the same thing in black ?
मिळेल की. ही बघा.	Yes. Look at these.
केवढ्याला ही ?	How much are these ?
सव्वीस रुपये.	Twenty-six rupees.
बापरे. कोल्हापुरी हयापेक्षा कमी किंमतीत येईल का ?	Heavens. Will Kolhapuris be cheaper ?
एवढीच किंमत पडेल, साहेब / बाई. किंमती वाढल्यात आता.	They'll be the same, saheb/bai. The prices have gone up now.
बरं, ही द्या तर मग.	Well, OK. Then give me these.

✣

Please Show Me Some Saris

साड्या दाखवा हो सहावारी. सुतीमधे दाखवा.

Please show me some six-yard saris. Show me in cotton.

हया बघा इकडे आहेत — सोलापुरी, नागपुरी, पुणेरी[1].

Look at these here — Solapuri, Nagpuri, Puneri.

काठापदराच्या[2] नकोत. नवीन डिझाइन्सच्या आहेत का प्रिंटेड वगैरे ?

I don't want traditional ones. Do you have any new designs— printed or some such ?

मग वायल बघा. नाहीतर टेरीनमधे दाखवू का ? त्यात सुंदर लेटेस्ट डिझाइनच्या साड्या आहेत. हया बघा.

Then look at some voiles. Or shall I show you some in terene[3]? In that there are beautiful saris in the latest designs. Look at these.

हयांच्या किमती साधारण काय येतात ?

How much do these cost on the average ?

ही एकशेसाठची. हयात चार रंग आहेत. मग ही पावणेदोनशे.

This is for one hundred and sixty. There are four colors in this. And this is one seventy-five.

सुतीपेक्षा किमती फार जास्त आहेत, नाही ?

They cost a lot more than cotton, don't they ?

(*Cont.*)

पण हा माल टिकायला फार चांगला, बाई. परत इस्त्रीची भानगड नाही.	But this material lasts well, bai. Moreover, there's no bother about ironing.
हे खरं बाकी. हयातली आणखी जरा डिझाइन्स दाखवा ना.	That's true. Please show me some more designs in this.

Notes

[1] These are the names of traditional sari patterns. Each is named after the city where it is woven.

[2] This term refers to traditional saris, which have a border and a decorated end.

[3] 'Terene' or 'terylene' refer to varieties of polyester fabrics.

Where Did You Buy It ?

कुडता छान आहे. आयता मिळाला का ?	This kurta is very nice. Did you get it readymade ?
हो.	Yes.
कुठे ?	Where ?
मेन स्ट्रीटवर.	On Main Street.
केवढ्याला मिळाला ?	For how much did you get it ?
पन्नास रुपयाला.	Fifty rupees.

कुडता छान आहे. आयता मिळाला का ?	This kurta is very nice. Did you get it readymade ?
नाही, शिवून घेतला.	No, I had it stitched.
कापड कुठे घेतलं ?	Where did you get the material ?
खादी भांडारात.	In the Khadi Bhandar.
केवढ्याला ?	For how much ?
अकरा रुपये मीटर.	Eleven rupees a meter.

हे बघ. मी नवी साडी घेतलीय.	Look. I've gotten a new sari.
फारच सुंदर आहे. कुठे घेतली ?	It's really beautiful. Where did you get it ?

(Cont.)

लक्ष्मी रोडवर — भारत साडी सेंटरमधे.	On Laxmi Road—in the Bharat Sari Center.
हा रंग मला खूप आवडला. ह्याला काय म्हणतात ?	I like this color very much. What's it called ?
मोरपंखी.	मोरपंखी.
साडी रेशमी आहे का ?	Is the sari silk ?
अर्धी रेशमी, अर्धी सुती. ह्याला गर्भ-रेशमी म्हणतात.	Half silk and half cotton. It's called गर्भरेशमी.
केवढ्याला मिळाली ?	What did it cost ?
तीनशे रुपये.	Three hundred rupees.
चपला छान आहेत. पुण्याला घेतल्या का ?	These chappals are very nice. Did you get them in Pune ?
नाही, इथे बनवून घेतल्या.	No, I had them made here.
अरे वा. इतकं चांगलं काम इथे करतात हे मला माहीत नव्हतं. केवढ्याला मिळाल्या ?	My, I didn't know they do such good work here. How much were they ?
पंचवीस रुपये.	Twenty–five rupees.

PRACTICE

A. Translate the following sentences into Marathi.

1. How much are the mangoes ?
2. Are they sweet ?
3. Reduce the price a little.

4. Give me ripe ones.
5. Did you get some apples?
6. How much were they?
7. I want a ballpoint pen.
8. Give me a plain one.
9. What is the price of this?
10. Please show me some pant material.
11. How much is this a meter?
12. Don't you have another color?
13. I want to get a kurta. Where can I get one?
14. How much are these chappals?
15. Give me these.
16. Please show me some handloom saris.
17. How much do these cost on the average?
18. Where did you get your chappals?
19. Did you get your kurta readymade?
20. How much did it cost?

B. This unit offers ample scope for role play—bargaining for fruit and vegetables, shopping in a stationery, grocery, or cloth store, talking about what one has purchased, etc. Use the vocabulary manual for names of vegetables, grains, etc.

Additional practice

Kavadi and Southworth, conversations 9 a-b, 11 a-b, 12 a-b, 13 a-b, 14 a-b, 16 a-b, 32 a-b, 33 a-b, 48 a-b

Six

COLLEGE LIFE

What Are You Studying ?

तुम्ही काय शिकता ?	What do you study ?
कॉलेजला आहे.	I'm in college.
कोणत्या साइडला ?	On what side ?
आर्टस्‌कडे ?	In Arts.
कुठल्या वर्षाला ?	In which year ?
एफ् वाय् ला.	F.Y.
तुमचा विषय कुठला ?	What is your major ?
हिस्टरी.	History.

कॉलेजमधे तू कुठल्या वर्षाला आहेस ?	What year are you in college ?
दुसऱ्या.	Second year.
कोणत्या साइडला ?	On what side ?
सायन्स.	Science.
कुठल्या ग्रूपला ?	What group are you in ?
बी ग्रूप.	B group.
कुठला विषय प्रिन्सिपल म्हणून घेणार ?	What are you going to major in ?
बॉटनी.	Botany.

कॉलेजमधे तुम्ही कोणत्या वर्षाला आहात ?	What year are you in college ?
मी टी वाय् बी कॉमला आहे.	I'm in T.Y. B.Com.
प्रिन्सिपल सब्जेक्ट काय आहे ?	What's your major ?
अकौंटिंग.	Accounting.

What Do You Think of Your Classes?

जाधव सरांचे इंग्लिशचे पीरियड्स् कसे वाटतात ?	What do you think of Jadhav Sir's English classes ?
बरे वाटतात.	They're OK.
आणि भावे सरांचे हिस्टरीचे पीरियड्स् ?	And what do you think of Bhave Sir's history classes ?
भयंकर बोअर.	They're a bore.
फिलॉसफीचे सर कसे आहेत ?	How is the philosophy professor ?
बरे आहेत. चांगल्या नोट्स् देतात.	He's all right. He gives good notes.
केमिस्ट्रीच्या बाई कशा काय शिकवतात ?	How does the chemistry professor teach ?
छान शिकवतात. त्यांची लेक्चर्स समजायला सोपी असतात.	She teaches very well. Her lectures are easy to understand.
इकॉनॉमिक्सच्या बाई चांगल्या शिकवतात का ?	Does the economics professor teach well ?
विशेष चांगलं शिकवत नाहीत. त्यांची लेक्चर्स कळतच नाहीत. डोक्यावरून जातात.	She doesn't teach very well. I can't understand her lectures. They go over my head.

How Did the Exam Go?

इंग्रजीचा पेपर कसा गेला ?	How did you do in the English exam ?
सोपा होता. सगळे एक्स्पेक्टेड क्वेस्च-नूस होते.	It was easy. It had all the expected questions.[1]
अंदाजे किती मार्क पडतील तुला ?	About how many marks will you get ?
साठ-पासष्ठ पडतील.	I'll get sixty or sixty–five.
हिस्टरीचा पेपर कसा होता ?	How was the history exam ?
खूप अवघड होता. सगळे प्रश्न अगदी किचकट होते.	It was very hard. All the questions were about small details.
पण पास होशील ना ?	But you'll pass, won't you ?
काही सांगता येत नाही.	I can't say.
मराठीचा पेपर कसा गेला ?	How did the Marathi exam go ?
बरा गेला. फक्त एक-दोन प्रश्न जरा अवघड होते.	It was all right. Only one or two questions were rather difficult.
साधारण किती मार्क पडतील ?	About how many marks will you get ?
पन्नासेक टक्के पडतील असं वाटतं.	I'll get about fifty percent, I think.

स्टॅटिस्टिक्सचा पेपर कसा होता ?	How was the statistics exam ?
भयंकर अवघड होता. निम्मा पेपर सुद्धा मला सोडवता आला नाही.	Awfully hard. I couldn't answer even half the questions.
तू अभ्यास केला होतास का ?	Had you studied ?
हो, केला होता, पण मुळातच मला हा विषय समजत नाही, म्हणून अभ्यास केला तरी त्याचा काही उपयोग नाही.	Yes, I had, but basically I don't understand the subject, so even if I study it doesn't do any good.

Note

[1] The phrase 'expected questions' refers to a list of probable examination questions handed out by the professor.

PRACTICE

A. Translate the following sentences.

1. What do you study ?
2. What year are you in college ?
3. What side are you on ?
4. What is your major ?
5. What do you think of the sociology class ?
6. His lectures are easy to understand.
7. Her classes are a bore.
8. How did the exam go ?
9. It was easy.
10. I will pass.

B. Do each of the following.

1. Tell what year you are in college and what is your major.
2. Comment on a recent exam and ask your friend what he/she thought of it.

Additional practice

Kavadi and Southworth, conversations 44 a–b, 51 b
Nimbkar and Berntsen, *Marathi Readings*, pp. 31–40

Seven

HOUSEHOLD ROUTINE

Have You Had Your Bath?

पाणी गरम झालंय. तुला आंघोळीला जायचंय का ?

The water is hot Do you want to go for your bath ?

हो, मी टॉवेल घेऊन येतो / येते. दोन मिनिटांत.

Yes, just two minutes. I'll go get my towel.

पाणी तापलंय का ?

Is the water hot ?

अजून पाच-दहा मिनिटं लागतील.

It'll take another five or ten minutes yet.

पाणी फारसं तापलेलं नाही आणि अजून तीन-चार जणांच्या आंघोळी व्हायच्या आहेत. तू बंबात आणखी विस्तव घालतोस / घालतेस का ?

The water isn't very hot and three or four people still have to take their baths. Would you put a little more wood in the boiler ?

हो, घालतो / घालते.

Sure.

मला आंघोळ करायचीय. पाणी तापलंय का ?

I want to take a bath. Is the water hot ?

नाही, हीटर चालू कर. पंधरा-वीस मिनिटांत पाणी तापेल.

No, turn on the heater. It'll be hot in fifteen, twenty minutes.

तुझी आंघोळ झालीय का ?	Have you had your bath ?
हो, झालीय.	Yes, I have.
मी बाळाला आंघोळ घालणार आहे. आम्ही लहान मुलाला आंघोळ कशी घालतो तुला बघायचंय का ?	I'm going to give the baby a bath. Do you want to see how we bathe a baby ?
हो, बघायचंय.	Yes, I do.
तुला आज न्हायचंय का ?	Do you want to wash your hair today ?
हो.	Yes.
मग शिकेकाई वापरणार का ?	Then are you going to use some *shikekai* ?
शिकेकाई म्हणजे काय ?	What is *shikekai?*
हा आमचा देशी शांपू आहे. ही पावडर गरम पाण्यात मिसळून डोक्याला लावायची.	This is our homegrown shampoo. You mix this powder in warm water and rub it on your head.
मी वापरून बघतो / बघते.	I'll try it and see.
फक्त डोळ्यांत जाऊ देऊ नकोस बरं का ! भयंकर आग होते.	But don't let it go in your eyes ! It burns like mad.
आंघोळीला तुम्ही वॉशक्लॉथ वापरत नाही का ?	You don't use a washcloth for your bath ?

(Cont.)

नाही, आम्ही अंग हातांनी चोळतो आणि पाय घासायला हा दगड वापरतो.	No, we rub ourselves (' body ') with our hands. And to scrub our feet we use this stone.[1]

Note

[1] a pumice stone

What Are You Going To Do Today ?

आज तुझा काय प्रोग्रॅम आहे ?	What's your program today ?
सकाळी कॉलेजमधे माझे दोन तास आहेत. मग दुपारी मला युनिव्हर्सिटीच्या लायब्ररीत जायचंय काही पुस्तकं घ्यायला.	In the morning I have two periods in the college. Then in the afternoon I want to go to the university library to get some books.
तू दुपारी जेवायला येणार आहेस का ?	Are you coming home for lunch ?
नाही, दुपारी मी हॉटेलात काहीतरी खाईन. पण संध्याकाळी नेहमीप्रमाणे जेवायला असेन.	No, in the afternoon I'll have something to eat in a restaurant. But I'll be here for the evening meal as usual.
आज बाहेर जाणारायस का ?	Are you going out today ?
हो, मला लक्ष्मी रोडवर कुडत्याचं कापड घ्यायचंय.	Yes, I want to get some kurta material on Laxmi Road.
येताना माझं एक काम करशील का ?	On your way back will you do a job for me ?
हो करीन की.	Sure, what do you want ?
वैभव मेडिकल स्टोअर्समधनं हे औषध आणायचंय. थांब, मी पैसे देतो / देते.	I want to get this medicine from the Vaibhav Medical Store. Wait a minute, I'll give you the money.

आज रात्री मी मैफलीला जाणार आहे. यायला जरा उशीर होईल.	Tonight I'm going to a concert. I'll be back rather late.
तू एकटाच/एकटीच जाणार आहेस का ?	Are you going alone ?
नाही, आम्ही दोघं-तिघं[1] जाणार आहोत.	No, two or three of us are going.
मग काही हरकत नाही. किती वाजता येशील ?	Then it's OK. What time will you be back ?
एक वाजेपर्यंत येईन.	I'll come back by one.
मग मी घराची किल्ली देतो/देते. पण ती जपून ठेव बरं का.	Then I'll give you the key to the house. But be sure you take good care of it.
आज कुलकर्ण्यांच्याकडलं लग्न आहे. तुला यायचंय नं ?	The wedding at the Kulkarnis' is today. You want to come, don't you ?
हो, यायचंय की. किती वाजता जायचंय ?	Yes. Definitely. What time are we to go ?
दुपारी दोन वाजता जाऊ. आणि संध्याकाळी जेवण आहे म्हणून दुसरा काही प्रोग्रॅम ठेवू नकोस.	We will go at two in the afternoon. And there's a dinner in the evening. So don't make any other plans.
ठीक आहे.	All right.
आज तुझा काय प्रोग्रॅम ?	What's your program today ?

(Cont.)

मी वडारवाडीला जाऊन झोपडपट्टीतल्या काही लोकांच्या मुलाखती घेणार आहे.	I'm going to go to Wadarwadi and interview some people in the *jhopadpatti*.
तू एकटा / एकटी जाणार आहेस का ?	Are you going to go alone ?
नाही, आबा माझ्याबरोबर येणार आहे.	No, Aba is coming with me.
मग ठीक आहे.	Then it's OK.

Note

[1] If the speaker and the friends referred to are all women the form will be दोघी-तिघी.

Dinner Is Ready

जेवण तयार आहे. वाढू का ?	Dinner is ready. Shall I serve it ?
इतक्यात नको. पाच-दहा मिनिटं थांबा.	Not quite yet. Wait for five or ten minutes.
जेवण तयार आहे. लगेच वाढायचं का ?	Dinner is ready. Shall I serve it right away ?
हो चालेल. मी सगळ्यांना बोलावतो / बोलावते.	All right. I'll call everybody.
जेवायला चला.	Come to eat.
आलो / आले.	I'll be right there.
अजयला हाक मार, हात-पाय धुवून जेवायला ये म्हणून.	Call Ajay and tell him to wash his hands and feet and come to eat.
अजय, जेवायला चल.	Ajay, come to eat.
मला भूक नाही.	I'm not hungry.
असं चालायचं नाही. भूक असो किंवा नसो पानावर बसायला पाहिजे.	Nothing doing. Whether you're hungry or not you have to come to the table.

Phoning about Dinner

मी _____ बोलतोय / बोलत्येय.	This is _____ speaking.
तू कुठून बोलतोयस / बोलत्येयस ?	Where are you speaking from ?
कॉलेजमधनं. मी संध्याकाळी जेवायला येणार नाही. काही मित्रांबरोबर / मैत्रिणींबरोबर फिल्म इन्स्टिट्यूटला जाणार आहे.	From the college. I won't be home for dinner this evening. I'm going with some friends to the Film Institute.
मग तू कुठे जेवणार ?	Then where will you eat ?
मी मंगलमधे डोसा-बिसा खाऊन जाईन.	I'll get a *dosa* or something at Mangal (restaurant).
तसं कशाला ? त्यापेक्षा हवं तर मी तुझं जेवण ठेवून देते.	Why do that ? Instead, if you want I'll keep dinner for you.
बरं, तरी चालेल.	All right.
मी _____ बोलतोय / बोलत्येय, अनिलकडनं. अनिलच्या आईनी मला जेवायला बोलावलंय. म्हणून संध्याकाळी माझी वाट पाहू नका.	This is _____ speaking, from Anil's. Anil's mother has asked me to stay for dinner, so don't wait for me this evening.
ठीक आहे. तू किती वाजता घरी येशील ?	All right. What time will you come home ?

(Cont.)

अकराला आले / आले तर चालेल का ?	Will it be OK if I come at eleven ?
चालेल. आम्ही झोपलेलो असलो तर बेल वाजव म्हणजे झालं.	All right. Only ring the door-bell if we are asleep.
मी _____ बोलतोय / बोलत्येय. माझा अमेरिकन मित्र इथे आलेला आहे. त्याला आज घरी जेवायला बोलावलं तर चालेल का ?	This is _____ speaking. My American friend has come here. Would it be all right if I asked him over for dinner ?
हो जरूर. किती वाजता घेऊन येशील त्याला ?	Certainly. What time will you bring him ?
साडेसहाच्या सुमाराला.	About six-thirty.

Where Is Mother?

आई कुठे आहे ?	Where is Mother ?
बागेत आहे.	She's in the garden.
तिला फोन आलाय म्हणून सांग.	Tell her there's a phone call for her.
आई कुठेय ?	Where is Mother ?
वरती असेल.	She must be upstairs.
हे टपाल तिला दे.	Give her this mail.
आई कुठे आहे ?	Where is Mother ?
बाहेर गेलीय.	She's gone out.
ती आल्यानंतर मला फोन करायला सांगशील का ?	Would you tell her to phone me when she gets back ?
आई कुठे आहे ?	Where is Mother ?
आजीकडे गेलीय.	She's gone to Grandmother's.
तिला बोलावून आण. कोणीतरी तिला भेटायला आलंय म्हणावं.	Go call her. Tell her somebody has come to see her.

Will You Help?

_____, जरा इकडे ये.	_____, come here.
आलो / आले.	Coming.
तू मला मदत करतोस / करतेस का ?	Will you help me ?
हो, करतो / करते की. काय करू ?	Sure. What shall I do ?
ह्या कप-बशा पुसून टेबलावर ठेव.	Wipe these cups and saucers and put them on the table.
तू मला मदत करतोस / करतेस का ?	Will you help me ?
हो ना. काय करू ?	Sure. What shall I do ?
हे कांदे बटाटे चिरून ठेव.	Slice these onions and potatoes.
जरा एक काम करशील का ?	Will you do something ?
हो, काय करू ?	Sure. What shall I do ?
दुकानात जाऊन एक नारळ आण.	Go to the store and bring a coconut.
मी काय मदत करू ?	What help can I give ?
तुला पुऱ्या तळता येतील का ?	Will you be able to fry puris ?
येतील की ! त्याला काय झालं ?	Sure I will ! What's there to that ?

Has the Paper Come?

पेपर आलाय का ?	Has the paper come ?
हो, आलाय. टेबलावर ठेवलाय.	Yes, it has. I've put it on the table.
आणि टपाल ?	And the mail ?
टपाल आलंय पण तुझ्यासाठी काही नाहीये.	The mail has come, but there's nothing for you.
पेपर आलाय का ?	Has the paper come ?
नाही, अजून आला नाही.	No, it hasn't come yet.
काही टपाल आहे का ?	Is there any mail ?
हो, तुझ्यासाठी एक पत्र आलंय.	Yes, there's a letter for you.
पेपर आलाय का ?	Has the paper come ?
आज पेपर नाहीये. काल सुट्टी होती ना ?	There's no paper today. Yesterday was a holiday, you know.
आणि टपाल ?	And the mail ?
अजून आलं नाही. थोड्या वेळानी येईल.	It hasn't come yet. It'll come in a little while.

What Did You Do Today?

आज काय केलंस ?	What did you do today?
सकाळी कॉलेजमधे माझे दोन तास होते. मग दुपारी युनिव्हर्सिटीच्या लायब्ररीत गेलो / गेले काही पुस्तकं आणायला.	In the morning I had two periods in the college. Then in the afternoon I went to the university library to bring some books.
कुठे जेवलास / जेवलीस ?	Where did you eat lunch ?
स्वागतमधे.	In Swagat (restaurant).
दुपारी बाहेर गेला होतास / गेली होतीस का ?	Did you go out this afternoon ?
हो, लक्ष्मी रोडवर शॉपिंग करायला गेलो होतो / गेले होते.	Yes, I went shopping on Laxmi Road.
काय घेतलंस ?	What did you get ?
कुडत्यासाठी कापड.	Some cloth for a kurta.
आज काय केलंस ?	What did you do today?
मी वडारवाडीला जाऊन काही लोकांच्या मुलाखती घेतल्या.	I went to Wadarwadi and interviewed some people.
कशा झाल्या मुलाखती ?	How did the interviews go ?

छान झाल्या. लोक अगदी मोकळेपणाने बोलले.

They went very well. People spoke very freely.

आज काय केलंस ?

What did you do today ?

युनिव्हर्सिटीला जाऊन माझ्या प्रोफेसरांना भेटलो / भेटले.

I went to the university and met my professor.

ते काय म्हणाले ?

What did he say ?

माझा रिपोर्ट त्यांना खूप आवडला.

He liked my report very much.

छान प्रगती चाललीय म्हणाले.

He said I'm making good progress.

आज काय काय केलंत ?

What all did you do today ?

सकाळी घरकाम केलं आणि दुपारी सिनेमाला गेलो / गेले.

This morning I did some housework and this afternoon I went to a movie.

कुठला सिनेमा पाहिलात ?

What did you see ?

' आक्रोश. '

' *Akrosh*. '

आवडला का ?

Did you like it ?

हो, फार आवडला.

Yes. I liked it a lot.

I'm Going To Bed

मी झोपायला जातोय / जात्येय.	I'm going to bed.
मी तासभर वाचत बसलो / बसले तर उजेडाचा त्रास होईल का तुम्हाला ?	If I read for an hour will the light bother you ?
मी दार लावून घेतो / घेते, म्हणजे नाही होणार.	I'll close the door, then it won't bother me.
तुम्ही किती वाजता उठता ?	What time do you get up ?
सहाच्या सुमाराला.	Around six.
तुम्ही उठलात की मलाही उठवा.	Wake me up too, when you get up.
ठीक आहे. गुड नाइट.	All right. Good night.
मी झोपायला जातोय / जात्येय. पाठीमागच्या दाराची कडी लावलेली आहे का ?	I'm going to bed. Is the back door bolted ?
मी बघतो / बघते.	I'll see.
तू झोपायला जाशील तेव्हा दिवे घालव.	When you go to bed turn out the lights.
ठीक आहे.	OK.

चला, मुलांनो. झोपायची वेळ झालीय. उद्या शाळा आहे.	Come on kids It's time to go to bed. There's school tomorrow.
आम्हाला थोडा वेळ खेळू दे ना.	Please let us play for a little while.
आता खेळणं–बिळणं काही नाही. उठा, रात्रीचे कपडे घाला.	No playing now. Get up. Put on your night clothes.

PRACTICE

A. Translate the following sentences into Marathi.

1. I want to take a bath. Is the water hot?
2. Have you had your bath?
3. I want to wash my hair today.
4. Dinner is ready.
5. Is dinner ready?
6. Come to eat.
7. What are you going to do today?
8. This afternoon I have two periods in the college.
9. I'm going to a play.
10. I'm going shopping.
11. I'm not coming home for lunch today.
12. My friend has come. Would it be OK if I invited him/her for dinner?
13. Where is Father?
14. He's gone out.
15. Will you help me?
16. What shall I do?
17. May I help?

18. Has the mail come ?
19. Is there a letter for me ?
20. What did you do today ?
21. I went to the university library.
22. I went to see a school.
23. I'm going to bed.
24. What time do you get up ?
25. Will you call me in the morning ?

B. Respond to the following questions.

१. तुझी आंघोळ झालीय का ?
२. जेवण तयार झालंय. वाढू का ?
३. तू आज काय करणारायस ?
४. तू दुपारी जेवायला येणारायस का ?
५. आई कुठेय ?
६. तू मला मदत करतोस / करतेस का ?
७. माझं एक काम करशील का ?
८. पेपर आलाय का ?
९. आज काय केलंस ?
१०. तू किती वाजता उठणारायस ?

C. Taking the part of a host or hostess, do each of the following.

1. Inform your guest that the water is hot and ask him if he wants to go for a bath.
2. Call everyone to eat.
3. Ask your guest what he/she is going to do today.
4. Ask your guest what he/she has done today.

D. Taking the part of a guest, do each of the following.

1. Call your hostess and say you won't be home for lunch.
2. Call your hostess and say you will be coming home late for dinner.
3. Call your hostess and say you will be spending the night at a friend's home.
4. Call your hostess and ask if you can bring a friend home for dinner.

Additional practice

Kavadi and Southworth, 10 b, 17 a–b, 19 a–b, 49 a–b

Eight

FOOD

MEALTIME ROUTINES

जेवायला चला.	Come to eat.
चला, पानावर बसा.	Come. Sit down to eat.
बसा.	Please start.
जेवण सावकाश होऊ द्या.	Take your time.
हवं ते मागून घ्या.	Ask for whatever you want.
संकोच करू नका.	Don't feel shy.
काय हवंय आपल्याला ?	What would you like ?
काही नको. पोटभर झालं.	Nothing at all. I'm full.
आग्रह करू नका हो. मला खरंच काही नकोय. माझं पोट भरलंय.	Please don't insist. I really don't want anything more. I'm full (' my belly is full ').
मी उठू का ?	May I get up ?[1]
पान / विडा घेता का ?	Will you have some *pan* ?
चालेल.	All right.
जेवण फार छान झालं होतं हं.	The meal was very good.

[1] This is said in asking leave to get up when one is finished eating.

Do You Like Our Food?

आमचं जेवण तुम्हाला आवडतं का ?	Do you like our food ?
तिखट आवडत नाही. बाकी सगळं आवडतं.	I don't like hot (spicy) food. I like everything else.
इथलं जेवण तुम्हाला आवडतं का ?	Do you like the food here ?
हो, आवडतं की.	Yes, I do.
कुठले पदार्थ विशेष आवडतात ?	What dishes do you like especially ?
श्रीखंड–पुरी, मसालेभात, बेसनाचे लाडू.	*Shrikhand–puri, masalebhat, besnace ladu.*
जिलब्या आवडतात का ?	Do you like *jilebis* ?
तितक्याशा नाही आवडत. फार गोड वाटतात.	Not so much. I find them too sweet.
इथलं रोजचं जेवण कसं काय वाटतं ?	What do you think of every-day meals here?
ठीक वाटतं. अधनंमधनं मात्र कंटाळा येतो, रोज तेच तेच असतं म्हणून.	I think they're OK. Once in a while though, I get tired of them because every day there's the same thing.

भाकरी–पोळी आवडते का ?	Do you like *bhakri* and *poli* ?
हो, आवडते की.	Yes, I do.
आणि आमटी–भात ?	And *amti* and rice ?
तोही आवडतो.	I like them too.
तुम्हाला कोणती भाजी आवडते ?	Which vegetable curry do you like ?
बटाट्याची.	Potato.
तुम्हाला तिखट जेवण आवडतं का ?	Do you like hot food ?
थोडंसं तिखट असलं तर आवडतं. जास्त तिखट असलं तर त्रास होतो.	I like it if it's only slightly hot. If it's too hot, it bothers me.
कोणते फराळाचे पदार्थ आवडतात ?	What snacks do you like ?
मसाला डोसा आणि दहीवडा.	*Masala dosa* and *dahivada*.
इडली आवडते का ?	Do you like *idli* ?
चांगली हलकी असली तरच आवडते.	I like it only if it's nice and light.

Are You Non-Vegetarian?

तुम्ही मासाहारी आहात का ?	Are you non-vegetarian ?
हो आहे.	Yes I am.
तुम्ही मास-मच्छर खाता का ?	Do you eat non-vegetarian food ('meat and fish') ?
मास खात नाही, मासे खातो.	I don't eat meat but I eat fish.
तुम्ही शाकाहारी आहात का ?	Are you vegetarian ?
घरी आम्ही फक्त शाकाहारी जेवण घेतो पण बाहेर मटण, फिश वगैरे खातो.	At home we have only vegetarian food but outside we eat meat, fish, and such.
तुम्ही शाकाहारी आहात का ?	Are you vegetarian ?
मी आणि मुलं नाही, पण माझी बायको आहे. ती अधनंमधनं आमच्यासाठी मटण बनवते पण स्वतः खात नाही.	My children and I aren't, but my wife is. She sometimes fixes meat for us but she herself doesn't eat it.
तुमच्याकडे मास-मच्छर चालतं का ?	Do you eat non-vegetarian food in your home ('is non-vegetarian food acceptable') ?
नाही, अजिबात नाही. आम्ही अंडी सुद्धा खात नाही.	No, not at all. We don't even eat eggs.

तुमच्याकडे मास-मच्छर चालतं का ?

तसं चालतं, पण आम्ही क्वचितच खातो. आणि खातो तेव्हाही त्याच्यासाठी वेगळी भांडी वापरतो.

Do you eat non-vegetarian food in your home ?

Yes but we have it only rarely. And when we do we use separate pots and pans for it.

तुम्ही मटण खाता का ?

तसा खातो अधनंमधनं, प्रसंग पडला तर. पण मला विशेष आवडत नाही.

Do you eat meat ?

I do once in a while, when the occasion demands it. But I don't especially like it.

तुम्ही शाकाहारी आहात का ?

तसं नाही, पण आमचं रोजचं जेवण शाकाहारी असतं. महिन्यातून एक-दोनदा आम्ही मटण आणतो.

Are you vegetarian ?

Not really, but our everyday food is vegetarian. We bring meat only once or twice a month.

तुम्ही मांसाहारी असालच.

मी आहे पण सगळे अमेरिकन असतात असं नव्हे. हल्ली खूप अमेरिकन—विशेषतः तरुण—शाकाहारी असतात.

You must be a non-vegetarian.

I am but all Americans are by no means non-vegetarian (' it is not the case that all Americans are non-vegetarian '). These days many Americans—especially the youth—are vegetarians.

We Eat with Our Hands

अमेरिकेत तुम्ही काट्या-चमच्यानी जेवता नं ?

In America you eat (meals) with forks and spoons, don't you ?

हो.

Yes.

आमच्याकडे आम्ही हातानी जेवतो. ते तुम्हाला जमेल का ?

At our place we eat with our hands. Will you be able to manage ?

मी कधी हातानी जेवलो/जेवले नाही पण प्रयत्न करीन. कसं जेवायचं ते मला दाखवा आणि माझं काही चुकलं तर तसं सांगा.

I've never eaten with my hand but I'll try. You show me what to do and if I make a mistake tell me.

मुख्य म्हणजे फक्त उजव्या हातानी जेवायचं. आमटी भातावर ओतून भात कालवायचा. शक्य तितकं नीटनेटकेपणाने जेवायचं म्हणजे सबंध हात खरकटा होत नाही.

The main thing is you should eat only with the right hand. You pour the *amti* on the rice and mix the rice. You should eat as neatly as possible so that your whole hand doesn't get messy.

डावा हात अजिबात वापरायचा नाही का ?

You shouldn't use the left hand at all ?

(Cont.)

तसं नाही. पाणी पिण्यासाठी डावा हात वापरावा लागतो. आणि आमच्याकडे वाढायला कोणी नाही म्हणून आपल्याला वाढून घ्यावं लागतं. त्यासाठी डावा हात वापरावा लागतो.

No, It's not like that. You have to use your left hand to drink water. And in our house we don't have anybody to serve so we have to serve ourselves. For that we have to use the left hand.

What Are You Going To Have?

Conversations in a restaurant

काय घेशील ?	What are you going to have ?
फक्त कॉफी.	Only coffee.
(वेटरशी) दोन कॉफी.	(*to waiter*) Two coffees.
काय घेणार ?	What are you going to have ?
फक्त कॉफी. पण बिनसाखरेची मिळेल का ?	Only coffee. But can I get it without sugar ?
हो, मिळेल की.	Sure, you can.
(वेटरशी) दोन कॉफी, एक साधी आणि एक बिनसाखरेची.	(*to waiter*) Two coffees, one regular and one without sugar.
तू काय घेणारायस ?	What are you going to have ?
स्पेशल मसाला डोसा आणि कॉफी.	Special *masala dosa* and coffee.
मी इडली सांबार घेईन.	I'll have *idli-sambar*.
(वेटरशी) एक स्पेशल मसाला डोसा, एक इडली सांबार आणि दोन कॉफी.	(*to waiter*) One special *masala dosa*, one *idli sambar*, and two coffees.

(Cont.)

जेवण घेणार का ?	Are you going to have a meal?
हो, चालेल. इथे काय मिळतं ?	All right. What is available here ?
राइसप्लेट मिळते.	A rice plate.
ठीकंय. राइसप्लेट घेऊया.	All right, let's have that.
(वेटरशी) दोन राइसप्लेट.	(*to waiter*) Two rice-plates.

PRACTICE

A. Translate the following sentences into Marathi.

1. I don't like hot food.
2. I like almost everything.
3. Sometimes I get tired of it.
4. I don't like the sweets.
5. Are you vegetarian ?
6. Do you eat eggs ?
7. I've never eaten with my hand, but I'll try.
8. Please start (eating).
9. What would you like ?
10. Please give me some rice.
11. Have some *jilebis*.
12. No thanks, I've had enough.
13. Please don't insist, I'm really full.
14. What are you going to have ?
15. I want coffee without sugar.

B. Ask someone if he / she has eaten each of the following foods and if he / she likes it.

१. भाकरी
२. आमटी
३. पुरी
४. लाडू
५. श्रीखंड
६. मसालेभात
७. शिरा
८. कांदेपोहे
९. बटाटावडा
१०. आंबे

C. Answer the following questions about Maharashtrian food.

१. महाराष्ट्रीय जेवण तुम्हाला आवडतं का ?
२. कोणते पदार्थ आवडतात ?
३. कोणते पदार्थ आवडत नाहीत ?
४. इथलं जेवण तुम्हाला तिखट वाटतं का ?
५. काही पदार्थ फार तेलकट वाटतात का ?
६. पोळी तुम्हाला आवडते का ?
७. भाकरी कधी खाल्लीय का ? कशाची ? ती आवडली का ?
८. कोणत्या भाज्या आवडतात ?
९. कोणत्या भाज्या आवडत नाहीत ?
१०. तुम्ही नॉन-व्हेज खाता का ?
११. इथले नॉन-व्हेजचे पदार्थ कसे वाटतात ?
१२. इथले गोड पदार्थ आवडतात का ? कोणते ?

D. Tell about the food in your country/state.

Additional practice

Kavadi and Southworth, conversations, 36 a–b, 37 a–b.

Nine

HEALTH

I Don't Feel Well

मला बरं वाटत नाही.	I don't feel well.
काय होतंय ?	What's the trouble ?
माझं डोकं भयंकर दुखतंय आणि मला सारखं परसाकडे होतंय.	I have a terrible headache and diarrhea.
तुझ्याजवळ त्या मेक्साफॉर्मच्या गोळ्या आहेत नं ? त्यातली एक गोळी दर आठ तासांनी घे.	You have some Mexaform tablets, don't you ? Take one tablet every eight hours.
अन् काय खाऊ ?	And what should I eat ?
फक्त थोडासा भात, किंवा पाहिजे तर सफरचंद.	Only a little rice, or an apple if you want.
मला बरं नाही.	I'm not well.
काय होतंय ?	What's the trouble ?
ताप आहे, खोकला येतोय, आणि अंग दुखतंय.	I have a fever and a cough, and my body aches.
तुला फ्ल्यू झाला असेल. दोन ॲस्पिरिनच्या गोळ्या घेऊन झोप.	You've probably got the flu. Take two aspirins and go to sleep.
आणि काही खाल्लं तर चालेल का ?	And is it OK if I eat anything ?

(Cont.)

जेवण वगैरे घेऊ नकोस. फक्त मोसंब्याचा रस किंवा लिंबाचं सरबत पी.	Don't have a meal. Just drink a little orange juice or lemonade.
मला बरं वाटत नाही.	I don't feel well.
काय होतंय ?	What's the trouble ?
माझा घसा दुखतोय.	I have a sore throat.
तू असं कर, थोडंसं मीठ घेऊन पाण्यात टाकून त्याने गुळण्या कर. अन् ॲस्पिरिनची गोळी घे.	Do this. Take a little salt, put it in water, and gargle. And take an aspirin.

Additional sentences

तुमची तब्येत कशी काय ?	How is your health ?
बरी आहे.	It's all right.
मी आजारी आहे.	I am sick.
माझं पोट दुखतंय.	I have a stomachache.
माझ्या पोटात अधनंमधनं कळ येते.	I get a cramp in my stomach now and then.
मला ताप आलाय.	I have a fever.
मला थंडी वाजून येते.	I get chills.
मला गारठा झालाय.	I have a cold.
मला चक्कर येते.	I get dizzy.
मला उलट्या होतायत.	I keep vomiting.
माझ्या पोटात मळमळतंय.	I feel queasy.
मला जेवण जात नाही.	I can't eat.
मला भूक लागत नाही.	I have no appetite.

There are a number of other ways of expressing 'I have diarrhea.'

मला जुलाब होतायत.

मला सारखं संडासला होतं.

मला सारखी संडास होते.

My Friend Doesn't Feel Well

माझ्या मित्राला बरं वाटत नाही.	My friend doesn't feel well.
काय होतंय ?	What's the matter ?
त्याचं डोकं भयंकर दुखतंय. अन् त्याला ताप आला आहे.	He has a terrible headache and fever.
त्यानी ॲस्पिरिन घेतलं का ?	Has he taken any aspirin ?
हो, घेतलं. पण दुखणं थांबेना.	Yes he has, but the pain hasn't stopped.
मग डॉक्टरांना बोलवा.	Then call the doctor.
तो म्हणतो डॉक्टर नको.	He says he doesn't want a doctor.
तरी पण तुम्ही डॉक्टरांना फोन करा. काहीतरी सीरियस असू शकेल.	Still, you call the doctor. It could be something serious.
माझ्या मित्राला बरं वाटत नाहीये.	My friend isn't feeling well.
काय होतंय ?	What's the trouble ?
गेल्या आठवड्यापासून त्याला जुलाब होतायत अन् भूक लागत नाही. खूप अशक्तपणा आलाय.	Since last week he's had constant diarrhea and he has no appetite. He's become very weak.
त्यानी पुण्याला जाऊन डॉक्टरकडनं तपासून घेतलेलं बरं.	It would be best if he went to Poona and had a doctor examine him.

माझ्या मित्राला बरं वाटत नाही.	My friend isn't feeling well.
काय होतंय ?	What's the trouble ?
कालपासून त्याला चक्कर येतीय आणि उलट्या होतायत.	Since yesterday he's felt dizzy and has been vomiting too.
तो डॉक्टरकडे गेला का ?	Has he gone to a doctor ?
नाही, तो डॉक्टर नको म्हणतो.	No, he says he doesn't want a doctor.
तुम्ही त्याला सांगा की डॉक्टरकडे जायलाच पाहिजे. काहीतरी सीरियस असलं तर ?	You tell him he has to go to a doctor. What if it's something serious ?

What Happened?

काय झालं ?	What happened ?
माझा पाय मुरगळला.	I sprained my ankle.
आत्ताच ?	Just now ?
दहा मिनिटांपूर्वी.	Ten minutes ago.
खूप दुखतोय का ?	Does it hurt a lot ?
हो ना.	Yes.
असं कर, मी मीठ घातलेलं गार पाणी देतो/देते, त्यात पाच-दहा मिनिटं पाय ठेव. जरा दुखेल पण त्यामुळे सूज फारशी येणार नाही. नंतर मलम चोळून इलॅस्टिक बँडेज बांधू.	Do this. I'll give you some cold water with salt in it. Keep your foot in it for five or ten minutes. It will hurt somewhat, but because of it there won't be much swelling. Afterwards we'll rub ointment (on your foot) and bandage it with an elastic bandage.
काय झालं ?	What happened ?
माझं बोट चाकूनी कापलं.	I cut my finger with a knife.
फार कापलं नाही ना ?	It's not cut badly, is it ?
विशेष नाही.	Not especially.

(Cont.)

साबण घेऊन चांगलं धुवून काढ. मग मी मलम लावून पट्टी बांधून देतो / देते.	Take soap and wash (the wound) well. Then I'll apply salve and bandage it.

PRACTICE

A. Translate the following sentences into Marathi.

1. How is your health ?
2. I don't feel well.
3. What's the trouble ?
4. I have a stomachache.
5. I have a fever.
6. Is it OK if I eat anything ?
7. My friend doesn't feel well.
8. He should see a doctor.
9. Anita sprained her ankle.
10. The child cut his finger.

B. You have just returned from a trip and since yesterday have been suffering from diarrhea. You have a slight temperature and occasional stomach cramps. You don't feel like eating anything. You haven't vomited nor do you feel dizzy. You haven't seen the doctor. Answer the following questions.

१. तुझी तब्येत बरी नाही का ?
२. काय होतंय ?
३. किती दिवसांपासून होतंय ?
४. ताप आहे का ?
५. उलट्या होतायत का ?
६. चक्कर येते का ?

७. भूक लागते का ?
८. तू डॉक्टरांकडे गेल्यास / गेलीस का ?
९. मी डॉक्टरांना बोलवू का ?

C. A child you know has fallen on the road and hurt his / her knee. The knee is bleeding and dirty. Talk to the child and tell him / her what you will do.

Additional practice

Kavadi and Southworth, conversations 46 a–b, 47 a–b

Ten

TRAVEL

Where Do the Pandharpur Buses Leave From ?

पंढरपूरच्या गाड्या कुठून निघतात ?	Where do the Pandharpur buses leave from ?
बहुतेक गाड्या स्वारगेटवरून निघतात.	Most of them leave from Swargate.[1]
पंढरपूरला जायला किती तास लागतात ?	How long (' how many hours ') does it take to go to Pandharpur ?
मला नक्की माहीत नाही. मला वाटतं की सात-आठ तास लागत असतील.	I don't know for sure. I imagine it must take about seven hours or so.
ही फलटणची गाडी सासवड मार्गे जाते का ?	Does this Phaltan bus go *via* Saswad ?
नाही, शिरवळ मार्गे.	No, *via* Shirwal.

(at the terminal)

पंढरपूरची गाडी कुठे लागते ?	Where does the Pandharpur bus load ?
प्लॅटफॉर्म नंबर सहा.	Platform[2] number six.
माझं सामान जास्त आहे. वजन करून घ्यावं लागेल का ?	I have a lot of luggage. Will I have to get it weighed ?

(Cont.)

हो. त्या हमालाला सांगा. तो करील.	Yes. Tell that porter. He'll do it.
सव्वा सहाची औरंगाबाद गाडी अजून लागली नाही का ?	Hasn't the six-fifteen Aurangabad bus come to the loading dock yet ?
नाही, गाडी लेट आहे आज. अजून अर्ध्या तासानी लागेल.	No, the bus is late today. It'll load in half an hour.
बारामतीची गाडी अजून लागली नाही का ?	Hasn't the Baramati bus come to the platform yet ?
नाही, ती अजून आलीच नाही. वाटेत ब्रेकडाऊन झाली असेल.	No it hasn't even arrived yet. There must have been a breakdown enroute.
मग ती किती वाजता सुटेल ?	Then what time will it leave ?
गाडी आल्याशिवाय कसं सांगणार ?	Until it comes (' without its coming ') how can I say ?
वारीच्या वेळेला पंढरपूर गाड्यांमधे भयंकर गर्दी असेल ना ?	At the time of the pilgrimage there must be an awful rush in the Pandharpur buses, isn't there ?
हो, ते जादा गाड्या सोडतात तरी पण जागा मिळतच नाही.	Yes, they dispatch extra buses but you still can't get a seat.

Notes

[1]Swargate is one of the three State Transport bus terminals in Pune.

[2]The word for ' platform ' usually used on boards in terminals is फलाट.

I Want a Reservation on the Bus

नगर, उद्या सकाळी आठची गाडी.	Nagar,[1] tomorrow morning's eight o'clock bus.
किती ?	How many ?
एक.	One.
पन्नास पैसे द्या.	Give (me) fifty paise.
नाशिकच्या आज रात्रीच्या पावणे-आठच्या गाडीचं रिझर्वेशन द्या.	Give me reservation on tonight's quarter to eight Nasik bus.
ती गाडी फुल आहे. साडेनऊचं देऊ का ?	That bus is full. Shall I give you one for the nine-thirty bus ?
चालेल.	All right.
नागपूरचं बारा तारखेचं सकाळी सहा वाजताच्या गाडीचं एक रिझर्वेशन द्या.	Give me one reservation for the 6:00 a.m. bus to Nagpur on the twelfth.
त्या गाडीला ॲडव्हान्स बुकिंग करावं लागतं.	You have to buy a ticket in advance for that bus.

(Cont.)

असं होय ? किती पैसे लागतील ?	Oh I see (' is that how it is ? '). How much will it be ?
ते माझ्याकडे नाही. तुम्हाला शेजारच्या खिडकीत जाऊन विचारावं लागेल.	That's not my department. You'll have to go and ask at the next window.

Note

1. ' Nagar ' is short for ' Ahmednagar. '

You Can Stay in the Inspection Bungalow

पुढच्या आठवड्यात मला यवतमाळला जायचंय. मुक्काम कुठे करता येईल ?	Next week I want to go to Yeotmal. Where can I stay ?
तिथे इन्स्पेक्शन बंगला आहे. तो मोकळा असला तर तिथे तुम्हाला राहता येईल.	There's an inspection bungalow[1] there. If that's free you can stay there.
आधी रिझर्वेशन करायला पाहिजे का ?	Do you have to reserve it in advance ?
हो, एक्झिक्युटिव्ह इंजिनियरला पत्र लिहा. त्यांचा पत्ता मी तुम्हाला देतो.	Yes, write a letter to the Executive Engineer. I will give you his address.
तिथे जेवायची सोय आहे का ?	Do they provide meals (' is there an arrangement for meals ')?
हो, तिथे खानसामा असतो. तुम्हाला हवं तसं जेवण तो करील.	Yes, there's a *khansama* there. He will make whatever kind of meal you want.
पुढच्या आठवड्यात मला उस्मानाबादला जायचंय. तिथे राहाण्याची सोय कुठे होईल ?	Next week I want to go to Osmanabad. Where can I get a place to stay ?
तिथे डाक बंगला आहे, पण जागा नक्की मिळेल की नाही ते सांगता येत नाही.	There's a dak bungalow there but you can't be sure you'll get accommodation.

(Cont.)

नाही मिळाली तर ?	And if I don't ?
तिये दोन तीन बऱ्यापैकी लॉज आहेत.	There are two or three decent hotels there.

Note

1. An inspection bungalow (or dak bungalow) is mainly intended to provide accommodation for government officials on tour. When not occupied by a government official it is available to others.

Where Are You Going during Vacation ?

तू सुट्टीमधे कुठे जाणार आहेस ?	Where are you going during vacation ?
मी अजून ठरवलं नाही.	I haven't decided yet.
कुठे जाणार आहेस सुट्टीत ?	Where are you going during vacation ?
मी दक्षिणेकडे जायचा विचार करतोय/ करत्येय.	I am thinking of going South.
तू सुट्टीमधे कुठे जाणार आहेस ?	Where are you going during vacation ?
काश्मीरला जाणार आहे.	I am going to Kashmir.
कशी जाणार ?	How are you going ?
आगगाडीनी.	By train.
रिझर्वेशन केलं आहेस का ?	Have you made a reservation ?
नाही, अजून केलं नाही.	No, I haven't yet.
मग लवकर केलेलं बरं.	Then you'd better make it soon.
रिझर्वेशनची इतकी गरज आहे का ?	Is there that much need for a reservation ?

(Cont.)

हो तर. ह्या सीझनमधे प्रवाशांची खूप गर्दी असते. रिझर्वेशनशिवाय कुठेही जाऊ नकोस.	You bet. There's a big rush of travelers during this season. Don't go anywhere without a reservation.
तू फर्स्ट क्लासनी जाणार आहेस का ?	Are you going by first class ?
फर्स्ट क्लासनी खूप जास्त पैसे पडतात का ?	Does first class cost a lot more ?
हो, सेकंडच्या तिप्पट पडतात.	Yes, three times as much as the second.
मग मी सेकंड क्लासनीच जातो/जाते.	Then I'll go by second class.
मग तुला वळकटी न्यावी लागेल. तुझ्याकडे आहे का ?	Then you'll need to take a bed-roll.[1] Do you have one ?
नाहीये. मी विकत घेईन. केवढ्याला पडेल ?	No I don't. I'll buy one. How much will it cost ?
मला वाटतं साठेक रुपये पडतील.	I think it will cost around sixty rupees.
तू किती तारखेला निघणार आहेस ?	What date are you leaving ?
वीस तारखेला.	On the twentieth.
कोणत्या मार्गाने जाणार ?	Which route are you taking ?
अहमदाबादवरून.	Via Ahmedabad.

(Cont.)

किती तारखेला दिल्लीला पोचणार ?	On what date will you reach Delhi ?
एकवीस तारखेला.	On the twenty-first.
दिल्लीला किती दिवस मुक्काम करणार ?	How long will you stay in Delhi ?
तीन दिवस.	Three days.

Note

[1] Most second class berths are wooden planks without any upholstering.

Where Are You Going To Stay?

तू दिल्लीमधे मुक्काम कुठे करणार आहेस ?	Where are you going to stay in Delhi ?
माझ्या मित्राकडे.	At my friend's.
आणि श्रीनगरमधे ?	And in Srinagar ?
एका हॉटेलमधे.	In a hotel.
हॉटेलमधे जेवणाची सोय असेल का ?	Is it likely that meals will be served in the hotel (' is there likely to be an arrangement for serving meals ') ?
हो असेल की.	Yes, there will.
बहुतेक ठिकाणी चिनतिखटाचं जेवण मिळतं का ?	In most places can you get meals that aren't (spicy) hot ?
बहुतेक ठिकाणी मिळत नाही.	In most places you can't.
मग काय खावं ?	Then what should I eat ?
नान, दही, साधा भात खात जा. बिर्याणीही चांगली असते आणि ती फारशी तिखट नसते. आणि इडली-डोसा पण हल्ली सगळीकडे मिळतो.	Eat *nan*, yogurt, and plain rice. *Biryani*[1] is good too and it's not very hot. And these days you can get *idlis* and *dosas*[2] all over too.

तू वॉटर बॅग बरोबर नेणार आहेस ना ?

You're going to take along a canteen, aren't you ?

नेलेली बरी असं तुला वाटतं का ?

Do you think it would be better if I did ?

हो. हॉटेलमधे पाणी उकळून घेत जा. न उकळलेलं पाणी अजिबात पिऊ नकोस.

Yes. Have them boil your water in the hotel. Don't under any circumstances drink unboiled water.

हॉटेलात गरम पाण्याची सोय असेल का ?

Is there likely to be hot water available in the hotel ?

बहुतेक ठिकाणी चोवीस तास गरम पाण्याची सोय नसते. आंघोळीला लागेल तेव्हा बादलीभर गरम पाणी आणून देतात.

In most places hot water isn't available all day long. When you need it for a bath they bring a bucketful of hot water.

Do You Want To Hire a Porter?

गाडी यायला अजून खूप अवकाश आहे. तुला सामान क्लोकरूममधे ठेवायचंय का ?	There's still a lot of time till the train comes. Do you want to put your luggage in the cloakroom ?
चालेल.	OK.
तुला हमाल हवाय का ?	Do you want a porter ?
नाही, त्याची गरज नाही.	No, there's no need for one.
तुला हमाल पाहिजे का ?	Do you want a porter ?
हो घेतलेला बरा. हमाली किती देऊ ?	I'd better take one. How much shall I pay him ?
पंचाहत्तर पैसे डाग.	Seventy–five paise per piece of luggage.

(to porter)

हमाल !	Porter !
कुठली गाडी, साहेब / बाई ?	Which train, saheb/bai ?
झेलम एक्स्प्रेस.	Jhelum Express.
मग पलिकडच्या प्लॅटफॉर्मवर जावं लागेल. चला.	Then you'll have to go to the next platform. Come on.

(Cont.)

तुमचा नंबर काय ?	What is your number ?
एकशेवीस साहेब / बाई.	One hundred twenty, saheb/bai.
गाडी वेळेवर येणार आहे का ?	Is the train going to come on time ?
नाही, एक तास लेट आहे.	No, it's an hour late.

(*porter to passenger in train*)

सामान कुठे ठेवू ?	Where shall I put the luggage ?
बाकाखाली ठेवा.	Under the seat.

How Was Your Trip?

प्रवास कसा झाला ?	How was your trip ?
छान झाला.	It was fine.
कुठे कुठे गेला होतात ?	Where all did you go ?
दिल्ली आणि आग्र्याला.	Delhi and Agra.
ट्रिप कशी झाली ?	How was your trip ?
छान झाली. खूप मजा आली.	It was fine. We had a lot of fun.
कुठे गेलात ?	Where did you go ?
मद्रास, म्हैसूर आणि त्रिवेंद्रमला.	To Madras, Mysore, and Trivandrum.
एकटेच / एकट्याच होतात का ?	Were you alone ?
नाही, आम्ही चौघेजण मित्र-मैत्रिणी मिळून गेलो होतो.	No, four of us friends went together.
ट्रिप कशी झाली ?	How was your trip ?
फारच छान.	It was great.
सेकंड क्लासमधे काही त्रास झाला का — ढेकणांचा-चिकणांचा ?	You didn't have any trouble in second class — from bedbugs or anything ?
अजिबात नाही. रात्री अगदी आराम-शीर झोप मिळाली.	Not a bit. At night I slept in complete comfort (' got completely comfortable sleep ').

प्रवास कसा झाला ?

How was your trip ?

ठीक झाला पण येताना मी आजारी पडलो / पडले.

It was OK, but coming back I got sick.

काय झालं ?

What happened ?

वाटेत काहीतरी खाल्लं-बिल्लं असेल म्हणून जुलाब आणि उलट्या झाल्या.

On the way I must have eaten something (I shouldn't have) so I had diarrhea and vomiting.

आता ठीक आहेस ना ?

Are you all right now ?

हो, अगदी ठीक.

Yes, completely.

ट्रिप कशी झाली ?

How was your trip ?

फारच छान. मी एकटा / एकटी होतो / होते म्हणून सुरवातीला मला थोडीशी भीती वाटत होती पण काही त्रास झाला नाही.

It was great. I was alone so I was a little nervous at first, but I didn't have any difficulty.

प्रवास कसा झाला ?

How was your trip ?

एकंदरीत छान झाला पण गाडीत माझं पाकीट मारलं गेलं.

On the whole it was fine, but my wallet got snatched in the train.

किती पैसे गेले ?

How much money did you lose?

फक्त दोनशे रुपये. बाकीचे ट्रॅव्हलर्स चेक होते.

Only two hundred rupees. The rest of the money was in travelers' checks.

(Cont.)

ट्रॅव्हलर्स चेक्स् घेतलेस ते बरं केलंस.	It was a good thing you got travelers' checks.
हो ना.	And how.

PRACTICE

A. Translate the following sentences.

1. Where do the Nasik buses leave from?
2. How long does it take to go to Nasik?
3. Give me a reservation on tomorrow morning's seven o'clock bus to Nasik.
4. Where does the Nasik bus load?
5. Next month I want to go to Akola. Where can I stay?
6. Do you have to make a reservation in advance?
7. Do they provide meals?
8. Where are you going during vacation?
9. Have you made a reservation?
10. There's a lot of rush during this season.
11. On what date are you leaving?
12. Where are you going to stay in Srinagar?
13. Is it likely that meals will be served in the hotel?
14. How much shall I pay the porter?
15. Is the train going to come on time?

B. Answer the following questions about a trip (real or imaginary) you have taken in India.

१. प्रवास कसा झाला?
२. तुम्ही कुठे कुठे गेलात?

३. कसे / कशा गेलात ?
४. एकटे / एकटचा गेलात का ?
५. मुक्काम कुठे केलात ?
६. काय काय पाहिलंत ?
७. तुम्हाला कोणतं ठिकाण सगळ्यात जास्त आवडलं ?
८. काही स्थानिक लोकांशी बोलल्यात का ?
९. भाषेची अडचण आली का ?
१०. काही त्रास झाला का ?
११. तब्येत ठीक राहिली का ?
१२. या प्रवासात भारताबद्दल काय शिकलात ?

Additional practice

Kavadi and Southworth, conversations 25 a–b, 34 a–b, 35 a–b, 38 a–b, 39 a–b
Nimbkar and Berntsen, *Marathi Readings*, pp. 3–11

Eleven

LOCAL SERVICES

I Want To Get My Clothes Washed

मला कपडे धुवून घ्यायचेयत. धोबी कुठे असतो ?	I want to get my clothes washed. Where does the washerman live ?
ह्या गल्लीमधे.	In this lane.
तो इस्त्री सुद्धा करतो का ?	Does he also do ironing ?
हो, करतो की.	Sure he does.
माझे कपडे धुवायला टाकायचेत. कोणाकडे देऊ ?	I want to give my clothes for washing. Who shall I give them to ?
नाना परीट ह्या दुकानाच्या शेजारी राहतो. त्याला द्या.	Nana the washerman lives next door to that shop. Give them to him.
तो इस्त्री सुद्धा करून देतो का ?	Does he iron too ?
देईल की.	Yes.
मला कपडे धुवून हवेत. ह्या गावात परीट आहे का ?	I want to get some clothes washed. Is there a washerman in town ?
हो, चिक्कार.	Yes, lots of them.
चांगलं काम करणारा कोण आहे ?	Who is one who does good work ?

(Cont.)

नाना पटाकडे जा.	Go to Nana Parit.
तो इस्त्रीसुद्धा करतो का ?	Does he iron too ?
हो करतो की.	Yes, he does.

मला काही कपडे धुवून घ्यायचेत. गावात परीट आहे का ?	I want to get some clothes washed. Is there a washerman in town ?
नाही, परीट नाही. पण एखादी मोलकरीण तुमचं धुणं करील.	No, there's no washerman. But some maidservant will do your washing.
इस्त्री सुद्धा करील का ?	Will she iron ?
नाही, इस्त्री करणार नाही.	No, she won't iron.

Inquiries about other services

मला चपला दुरुस्त करून घ्यायच्यायत. गावात चांभार आहे का ?	I want to get my chappals repaired. Is there a shoemaker in town ?
गावात कोणी चपला बनवून देईल का ?	Will anyone in town make chappals to order ?
मला केस कापून घ्यायचेत. न्हावी कुठे असतो ?	I want to get my hair cut. Where does the barber live ?
आमच्या घराला रंग द्यायचाय. रंगारी मिळेल का ?	I want to get our house painted. Is there a painter available ?

Will You Wash and Iron My Clothes?

तुम्ही माझे कपडे धुवून इस्त्री कराल का ?	Will you wash and iron my clothes ?
रोज धुवायला लागतील का ?	Will I have to wash every day ?
नाही, त्याची जरूर नाही. आठवड्यातनं दोनदा पुरे. तुम्ही किती पैसे घेता ?	No, that's not necessary. Twice a week will be enough. What do you charge ?
शंभर कपड्यांचे चाळीस रुपये.	Forty rupees a hundred.
ठीक आहे.	OK.

तुम्ही माझे कपडे धुवून इस्त्री कराल का ?	Will you wash and iron my clothes ?
हो, करीन की.	Yes.
किती पैसे घेणार ?	What will you charge ?
प्रत्येक कपड्याचा निराळा चार्ज असतो — शर्ट आठ आणे, पँट चाळीस पैसे.	There's a different charge for each item of clothing. Eight annas for a shirt, forty paise for a pair of pants.
म्हणजे फार महाग पडेल. रोज साधारण एवढे कपडे असतात. तर एकदम महिन्याचं काय घ्याल सांगा.	That will be very expensive. Every day there will be about this many clothes, so what will you charge by the month ?

(Cont.)

साठ रुपये घेईन.	Sixty rupees.
ठीक आहे, उद्यापासून कपडे पाठवीन.	That's OK. I'll send the clothes from tomorrow.
तुम्ही माझे कपडे धुवून इस्त्री कराल का ?	Will you wash and iron my clothes ?
करीन की. तुमच्याकडे येऊन करायचं का काम ?	Certainly. Shall I come to your place and do the work ?
हो.	Yes.
रोज यावं लागेल का ?	Will I have to come every day ?
रोज नाही. सोमवारी आणि गुरुवारी आलात तरी चालेल.	Not every day. It will be enough if you come on Monday and Thursday.

✣

I Want To Have a Kurta Made

In a tailor's shop

या कापडाचा कुडता शिवून घ्यायचाय.	I want to have a kurta made ('stitched') out of this material.
लांब बाह्यांचा पाहिजे का ?	Do you want a long-sleeved one ?
हो.	Yes.
गळा कसला ?	What kind of neckline ?
गोल करा.	Make it round.
मी माप घेतो / घेते. लांबी किती ठेवू ?	I'll take (your) measurements. How long shall I make it ?
इतकी.	This much.
बाहीची लांबी इतकी करू का ?	Shall I make the sleeve this long ?
चालेल.	That will do.
हूक लावू का ?	Shall I put on hooks ?
नको, बटणं लावा.	No, put on buttons.
खिसा पाहिजे का ?	Do you want a pocket ?
हो, दोन्ही बाजूंना ठेवा.	Yes, on both sides.
बरं.	OK.

(Cont.)

कधी मिळेल ?	When will it be ready ?
वीस तारखेला दिला तर चालेल का ?	Will it be all right if I give it on the twentieth ?
हो, चालेल.	Yes, that will do.
कुडत्याला हे कापड पुरेल का ?	Will this material be enough for a kurta ?
लांब बाहयांचा पाहिजे का ?	Do you want a longsleeved one ?
नाही, आखूड.	No, short–sleeved.
मग पुरेल. नेहरू कॉलर पाहिजे का ?	Then it'll be enough. Do you want a Nehru collar ?
नको, गोल गळा करा आणि बटणं लावा, हूक नको. उजवीकडे एक खिसा करा. लांबी मागच्यावेळे-इतकीच करा.	No, make a round neckline. And put on buttons, I don't want hooks. Make a pocket on the right–hand side. Make the length the same as you did last time.
ठीकंय.	OK.
केव्हा होईल शिवून ?	When will it be ready ?
आता दिवाळीची गर्दी आहे म्हणून लवकर देता येणार नाही. पंधरा डिसेंबरला देतो.	There's the Diwali rush now so I won't be able to give it very soon. I'll give it on the fifteenth of December.
बरं, चालेल.	That will be all right.

Is There a Carpenter Here?

मला एक कपाट बनवून घ्यायचंय. कोण देईल ?	I want to have a cupboard made. Who will make it ?
विठ्ठल सुतार म्हणून आहे, त्याच्याकडे जा.	There's a carpenter named Vitthal. Go to him.
तो चांगलं काम करतो का ?	Does he do good work ?
हो.	Yes.
मला एक कपाट बनवून घ्यायचंय. इथे सुतार आहे का ?	I want to have a cupboard made. Is there a carpenter here?
विठ्ठल सुतार म्हणून आहे. त्याच्याकडनं करून घ्या.	There's a carpenter named Vitthal. Have him do it.
तो चांगलं काम करतो का ?	Does he do good work ?
हो, अगदी फर्स्ट क्लास.	Yes, first class !
मला कपाट बनवून घ्यायचंय. इथे कुणी सुतार मिळेल का ?	I want to have a cupboard made Is there a carpenter here ?
नाही, हया गावात नाहीये. फलटणमधे करून घ्यावं लागेल. तिथे बरेच चांगले सुतार आहेत.	No, not in this town. You'll have to have it made in Phaltan. There are many good carpenters there.

✣

I Want To Have a Cupboard Made

At the cabinetmaker's

मिस्त्री, मला एक कपाट बनवून घ्यायचंय.	*Mistri,*[1] I want to have a cupboard made.
कसलं कपाट पाहिजे ?	What sort of cupboard do you want ?
पुस्तकांसाठी.	For books.
प्लायवुडचं करू का ?	Shall I make it out of plywood ?
मला वाटतं सागवानी जास्त बरं.	I think teak would be better.
सागवानी करता येईल पण विनाकारण खर्च वाढेल. प्लायवुडचंही चांगलं होईल.	I can make it of teak but it will unnecessarily increase the cost. A plywood cupboard too will be nice.
बरं, मग प्लायवुडचंच करा.	All right, then make it out of plywood.
काय साइजचं पाहिजे ?	What size cupboard do you want ?
उंची सहा फूट, रुंदी साडेतीन फूट आणि खोली दहा इंच.	Six feet high, three and a half feet wide, and ten inches deep.
दारं पाहिजेत का ?	Do you want doors ?
हो, पाहिजेत.	Yes, I do.

(Cont.)

दारं हार्डबोर्डची करू का ? त्याची चौकट मात्र प्लायवुडची ठेवू.	Should I make the doors out of hardboard ? The frame, though we'll have of plywood.
चालेल.	That will do.
डबल दारं पाहिजेत ना ?	You want double doors, don't you ?
हो.	Yes.
बरं, कपाट असं दिसेल. (स्केच दाखवतो.) चालेल ना ?	Well, the cupboard will look like this (Shows sketch.) This will do, won't it ?
हो, अगदी असंच पाहिजे. केवढ्याला पडेल ?	Yes, that's just what I want. How much will it cost ?
आठशे रुपये.	Eight hundred rupees.
बापरे. इतका खर्च होईल अशी कल्पना नव्हती मला.	Heavens, I had no idea it would cost so much.
हल्ली लाकडाचा भाव फार वाढलाय, साहेब / बाई. शिवाय मजुरीही खूप द्यावी लागते.	These days the cost of wood has gone way up, saheb/bai. Besides, we have to pay a lot for labor too.
ठीक आहे. पण कपाट मात्र अगदी चांगलं बनवा हं.	All right, but be sure you make the cupboard really well.
त्याची तुम्ही काळजी करू नका.	Don't you worry about that.
कधी तयार होईल ?	When will it be ready ?
पंधरा दिवस लागतील.	It will take fifteen days.
बरंय.	All right.

Note

[1] *Mistri* is an honorific term of reference and address for a master craftsman.

In the Post Office

एक पोस्टकार्ड आणि एक अंतर्देशीय पत्र द्या.	Give me one postcard and one inland letter.[1]
दोन पन्नास पैशांची तिकिटं द्या.	Two fifty paise stamps.

Customer gives a five-rupee note.

एक रुपयाची नोट नाहीये का ?	Don't you have a one-rupee note ?
नाहीये.	No, I don't.
दोन पोस्टकार्ड आणि एक पाकीट द्या.	Give me two postcards and an envelope.[2]
हे रजिस्टर्ड बुक-पोस्टानी पाठवायचंय. किती तिकिटं लागतील ?	I want to send this by registered book post. How many stamps will it need ?
वजन करून सांगतो / सांगते. प्रिंटेड पेपर्स आहेत का ?	I'll weigh it and tell you. Are they printed papers ?
नाही, पुस्तक आहे.	No. it's a book.
तीन रुपयांची तिकिटं लागतील.	You'll need three rupees' worth of stamps.

Additional sentences

मनी ऑर्डरचा फॉर्म द्या.	Please give me a money order form.
रिकॉर्डेड डिलिव्हरीचा फॉर्म पाहिजे.	I want a form for recorded delivery.
हे अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंग पाठवायचंय.	I want to send this under certificate of posting.
रजिस्टर्ड ए. डी.ची पावती द्या.	Please give me an acknowledgment receipt.
एअर मेलची दोन-तीन लेबलं द्या.	Please give me two or three air mail labels.
डिंकाची बाटली कुठे आहे ?	Where is the glue bottle ?

Notes

[1]An inland letter is a letter form used for correspondence within the country.

[2]Envelopes stamped with the minimum postage are available in the post office.

Bank Business

मी बँकेत चाल्लोय / चाल्लेय पैसे काढायला.	I'm going to the bank to withdraw some money.
आज बँकेला सुट्टी आहे.	Today is a bank holiday.
हो, खरंच. आज पारशी न्यू इयर आहे नाही का ? बरं, उद्या जाईन.	Yes, that's right ('it really is'). Today is Parsi New Year, isn't it ? Well, I'll go tomorrow.

In the bank the customer hands the teller his check and passbook.

कसल्या नोटा पाहिजेत ?	What kind of bills do you want ?
शंभराची एक, पन्नासाच्या दोन, विसाच्या पाच, दहाच्या पंधरा, आणि पाचाच्या दहा.	One one-hundred rupee note, two fifties, five twenties, fifteen tens, and ten fives.

Additional sentences

चेक वटला का ?	Did you get the check cashed ?
मला पैसे भरायचेत.	I want to deposit some money.
मला ड्राफ्ट पाठवायचाय.	I want to send a draft.
मला नवीन चेकबुक पाहिजे.	I want a new checkbook.
इथे सही करा.	Sign here.

मला सेव्हिंगचं खातं उघडायचंय.	I want to open a savings account.
मला चालू खातं उघडायचंय.	I want to open a current account.
मला कर्ज काढायचंय.	I want to take out a loan.
व्याजाचा दर किती ?	What is the rate of interest ?

✣

A Call to the Bank

हॅलो, स्टेट बँक का ?	Hello. Is this the State Bank ?
हो.	Yes.
मी रमेश कुलकर्णी बोलतोय. वीस तारखेला मी माझ्या खात्यावर एक हजार रुपयांचा चेक भरला होता. तो माझ्या पासबुकात अजून जमा झालेला दिसत नाही.	This is Ramesh Kulkarni speaking. On the twentieth I deposited a check for one thousand rupees in my account. I still don't see it credited in my passbook.[1]
तुमचा अकाउंट नंबर किती ?	What's your account number ?
दोनशे सतरा.	Two hundred seventeen.
चेक कुठला होता ?	Where was the check on ?
पुण्याचा.	On Pune.
थांबा दोन मिनिटं. मी बघून सांगतो / सांगते.	Please wait a couple of minutes. I'll have a look (' look and tell you ').

Clerk returns to phone

तो चेक अजून रिअलाइज झालेला नाही साहेब / बाई.	The money for that check hasn't come yet, saheb / bai.
अजून झाला नाही ? आता दोन	It still hasn't come ? It's two

(Cont.)

आठवडे झाले. जरा चौकशी कराल का ?	weeks now. Will you make inquiries ?
आणखी दोन दिवस थांबूया. तोवर पैसे नाही आले तर इन्क्वायरी पाठवू.	Let's wait two days more. If the money hasn't come by then, we'll send an inquiry.

Note

[1]Indian banks generally credit a check to one's account only after they have received the money for it.

PRACTICE

A. Translate the following into Marathi.

1. I want to get my clothes washed.
2. Will you wash and iron my clothes ?
3. How much will you charge by the month ?
4. I want to get my chappals repaired. Is there a shoemaker in town ?
5. Is there a good carpenter in town ?
6. I want to get a table and two chairs made.
7. I want to have a kurta made out of this material.
8. Make a long-sleeved one.
9. Where can you give it ?
10. Five fifty paise stamps and five inland letters.
11. I want to send this by registered post. How many stamps will it need ?

12. Please give me two one hundred-rupee notes, two fifties, and five twenties.
13. I want a new checkbook.
14. Has the money been credited to my account?
15. I want to get a haircut.

B. Do each of the following.

1. Talk to a washerman and arrange to have your clothes washed on a regular basis. Determine how often he will come, how many articles of clothing there will be each time, whether he will do ironing as well, what the charge will be, etc.
2. Make a list of what you need from the post office; then talk to the postal clerk.
3. Go to the bank and get a draft for Rs. 1,000 on the Pune City Branch of the State Bank of India in favor of Shri Motilal Shah.
4. Decide what you want made from the tailor. Go to him and give him instructions.
5. You want to have a small table and four chairs made. Talk to the carpenter and give him detailed instructions.

Twelve

HOUSEKEEPING

Have You Found a House?

घर मिळालं का ?	Have you found a house ?
घर नाही, एक खोली मिळाली.	Not a house, one room.
कशी आहे ?	How is it ?
बरी आहे.	OK.
बाथरूम आहे का ?	Is there a bathroom ?
हो. बाथरूम आहे, संडास आहे.	Yes, there's a bathroom and toilet.
मग छान.	Then that's fine.
तुम्ही जेवता कुठे ?	Where do you eat ?
सध्या मी हॉटेलमधे जेवतो.	Right now I'm eating in a restaurant.
जेवण कसं आहे ?	How's the food ?
चांगलं नाही. भयंकर तिखट आहे.	It's not very good. It's awfully hot.
त्यापेक्षा कुठूनतरी डबा का नाही मागवत ?	Why don't you instead have a meal sent from somewhere ?[1]
हो, तेच बरं होईल.	Yes, that would be better.

घर सापडलं का ?	Have you found a house ?
घर नाही, एक खोली.	Not a house, one room.
खोली बरी आहे का ?	Is the room nice ?
बरी आहे. बाथरूम, संडास आहे.	It'll do. There's a bathroom and a toilet.
अन् जेवायची सोय ?	And for your meals ?
मध्या हॉटेलमधे जेवतो.	I eat in a restaurant at present.
जेवण कसं आहे ? फार तिखट असेल ना ?	How's the food ? Isn't it awfully hot ?
हो नं.	It sure is.
त्यापेक्षा डब्यातलं जेवण बरं. मी कोणालातरी तुम्हाला डबा पाठवायला सांगू का ?	It would be better to get meals sent in a tiffin carrier. Shall I ask someone to send you one ?
हो, जरूर.	Yes, please do.

Note

[1] डबा literally means the container in which one meal is sent.

I Need a Cook

मला स्वैपाकी पाहिजे. तुमच्या ओळखीचा कोणी आहे का ?	I need a cook. Do you know anybody ?
एक माणूस आहे. त्याला तुमच्याकडे पाठवू का ?	There is one man. Shall I send him to your place ?
हो. जरूर पाठवा.	Yes, definitely.
मला स्वैपाकी पाहिजे. तुमच्या ओळखीचा कोणी आहे का ?	I need a cook. Do you know anybody ?
बुवाच पाहिजे का ?	Do you want a man ?
तसं नाही. बाई सुद्धा चालेल.	Not necessarily. A woman also will do.
एक बाई माझ्या ओळखीच्या आहेत. मी त्यांना तुमच्याकडे पाठवीन.	I know a woman. I will send her to your place.
नक्की पाठवा.	Please be sure to send her.
मला स्वैपाकी पाहिजे. तुम्हाला कोणी माहीत आहे का ?	I need a cook. Do you know anybody ?
बघितलं पाहिजे. मी चौकशी करून उद्या तुम्हाला कळवीन.	We'll have to inquire. I will make inquiries and let you know tomorrow.
ठीक आहे.	All right.

Additional sentences

मला माळी पाहिजे.	I want a gardener.
मला वॉचमन पाहिजे.	I want a watchman.
घरकाम आणि बागकामासाठी मला गडी पाहिजे.	I want a manservant for house and garden work.

✣

Hiring a Cook

A middle-aged woman comes to the door.

आत येऊ का बाई ?	May I come in, bai ?
या. कोण पाहिजे तुम्हाला ?	Come in. Who do you want ?
तुमच्याकडे स्वैपाकाला बाई लागायचीय म्हणून ऐकलं, म्हणून भेटायला आले.	I heard that you are in need of a woman to cook so I've come to see you.
तुम्हालाच काम हवंय का ?	You yourself want the work ?
हो.	Yes.
नाव काय तुमचं ?	What's your name ?
पार्वतीबाई शिंदे.	Parvatibai Shinde.
आधी कुठे स्वैपाकाचं काम केलं होतं का ?	Have you done cooking anywhere else before ?
हो, तीन-चार ठिकाणी केलेलं आहे. कदम मास्तरांच्याकडे. झालंच तर जोशी डॉक्टरांच्याकडे.	Yes, I've cooked in three or four places. At Kadam Master's. Also at Dr. Joshi's.
मग नोकरी का सोडली ?	Then why did you leave the job ?
काय सांगू बाई, आजारी पडले. फार दिवस दुखणं काढलं. आत्ताशी जरा हिंडायला फिरायला लागलेय.	What can I say, bai ? I fell sick. I was sick for a long time. Just now I've started getting around again.

(*Cont.*)

मग आता काम होईल का तुमच्यानं ?	Then will you be able to work now ?
होईल की. तसं स्वैपाकाचं म्हणजे फार जड काम नाही.	Yes, I will. Actually, cooking isn't all that heavy work.
पण दोन वेळचा स्वैपाक, भांडी, मंडईतनं भाजी आणायची ही सगळी कामं तुम्हाला करावी लागतील.	But cooking two meals, dishes, bringing vegetables from the market — you'll have to do all these jobs.
पगार काय देणार ?	How much will you pay ?
सुरुवातीला एकशे वीस रुपये देईन. मग तुमचं काम बघून वाढवीन.	To begin with I'll pay one hundred twenty rupees. Then after I see your work I'll raise it.
ठीक आहे. काम बघा माझं. मला स्वैपाकाची सगळी माहिती आहे. तुम्हाला पसंत पडेलच.	All right. You see my work. I know all about cooking. You'll definitely like my work.

A young woman comes to the door.

तुमच्याकडे स्वैपाकाची बाई पाहिजेय ना ?	You are in need of a cook, aren't you ?
होय, तुला स्वैपाक येतो का ?	Yes, do you know cooking ?
थोडा थोडा येतो. घरी करतेच की मी.	I know a little. I do the cooking at home.
आधी कुठे स्वैपाकाचं काम केलंयस का ?	Have you worked as a cook anywhere before ?
नाही, पण मी शिकेन तुमच्या हाताखाली. तुम्ही जसं दाखवाल तसं करीन मी.	No, but I'll learn under you. I'll do just as you show me.

(*Cont.*)

दुसरीकडे घरकाम केलंयस का ?

Have you done housework anywhere before ?

हो, तसं स्वैपाक सोडून बाकी सगळं केलंय. झाड लोट, धुणी-भांडी.

Yes, other than cooking I've done everything. Sweeping, washing, dishes.

हयाच्या आधी कोणाकडे काम करीत होतीस ?

For whom were you working before this ?

पाच-सहा घरी काम आहे.

I have work in five or six houses.

मग ते का सोडणार ?

Then why are you going to leave that ?

इतक्या ठिकाणी काम करायचं म्हणजे कष्ट फार पडतात बाई. त्यापेक्षा एका घरी सबंध वेळ केलेलं बरं.

It's really hard to work in so many places, bai. It's better to work the whole time in one place.

पण माझ्याकडे नुसतं स्वैपाकाचं काम नाहीये. भांडी धुवायची, बाजार करायचा, स्वैपाकघरातली झाडलोट, धूळ झटकणं सगळं करावं लागेल. आणि काम स्वच्छ पाहिजे अगदी.

But in my house there's not only cooking to do. You'll have to wash dishes, do the marketing, sweep the kitchen, dust, and everything. And I want things really clean.

करीन बाई मी.

I'll do it, bai.

नाव काय तुझं ?

What's your name ?

शालन पवार.

Shalan Pawar.

पगार काय घेणार ?

How much salary do you expect ?

तुम्ही पहिल्या बाईला काय देत होतात तोच मला द्या.

Pay me whatever you were paying your first woman.

(*Cont.*)

तेवढा एकदम नाही देणार. आधी शंभर देईन. मग स्वैपाक वगैरे शिकलीस आणि तुझं काम पसंत पडलं की वाढवून देईन.

I won't give you that much right away. I'll give you a hundred to start with. Then after you've learned cooking and such, if I like your work I'll raise it.

बरं, तसं का होईना. मग येऊ एक तारखेपासून कामाला ?

All right. Whatever you say. So shall I come to work from the first ?

ये. सकाळी बरोबर आठ वाजता ये.

Yes. Come in the morning at eight, o'clock sharp.

We're Going To Need Flour To Make Chapatis

चपात्या करायला आपल्याला कणीक लागणार. दुकानामधे मिळेल का ?	We are going to need flour to make chapatis. Is it available in the store ?
नाही, गहू दळून आणावा लागेल.	No, we'll have to get the wheat ground.
पोळ्या करायला आपल्याला आटा लागेल.	We'll need some flour to make chapatis.
उद्या बाजार आहे. मी गहू घेऊन दळून आणीन.	Tomorrow is bazar day. I'll get some wheat and have it ground.
पोळ्यांसाठी मी गहू आणला आहे. त्याचं काय करायचं ?	I've brought some wheat to make chapatis. What has to be done with it ?
पाखडून निवडून घ्यायचा. मग दळून आणायचा. मी करीन सगळं.	It has to be winnowed and cleaned, then ground. I'll do everything.
दळायला कुठे नेता ?	Where do you have it ground ?
गिरणी[1] जवळ आहे पुढच्या चौकामधे.	The mill is nearby— in the next intersection.

Note

[1]A grinding mill is called a गिरणी or चक्की.

What Shall I Make for Dinner?

जेवणाचं सांगता नं ?	Will you tell me what I should make for dinner ?
काय भाजी आहे आपल्याकडे ?	What kind of vegetables do we have ?
करडी आहे.	Safflower.
बरं, करडीची पातळ भाजी करा, आणि भात, साधं वरण आणि काकडीची कोशिंबीर करा.	OK. Make a liquid vegetable. And make rice, *dal* and cucumber salad.
बरं.	All right.
काय स्वैपाक करू ?	What shall I cook for dinner ?
आपल्याकडे पालेभाजी आहे का ?	Do we have any leafy vegetables ?
हो, तांदुळजा आहे.	Yes, *tandulja*.
मग त्याची भाजी करा आणि गाजराची कोशिंबीर आणि भाकरी.	Then make a curry of that. And carrot salad and *bhakri*.
जेवण काय करू ?	What shall I make for dinner ?
काय काय आहे आपल्याकडे ?	What all do we have ?
वांगी आहेत, मेथी आहे, मुळा आहे.	Eggplant, *methi*, radish.

(Cont.)

वांग्याची भाजी करा.	Make eggplant curry.
आणि भात करू का ?	Shall I cook rice ?
नाही, चपात्या करा.	No, make chapatis.
आणखी काय ?	What else ?
मुळ्याची कोशिंबीर करा.	Make radish salad.

जेवणाचं काय ?	What shall I cook ?
आपल्याकडे काय भाजी आहे ?	What vegetables do we have ?
पडवळ आहे, कोबी आहे.	There's *padval* and cabbage.
पडवळाची भाजी करा मुगाची डाळ घालून.	Make *padval* curry with *mung dal*.
भात करू का ?	Should I make rice ?
हो करा, आणि आमटी करा.	Yes, and make *amti*.
आणखी काय ?	What else ?
टमाटोची कोशिंबीर करा.	Make a tomato salad.

काय स्वैपाक करू ?	What shall I cook ?
गवारीची भाजी करा बटाटे घालून.	Make a curry out of *gavar*, with potatoes.

(Cont.)

पोळ्या करू का ?	Shall I make chapatis ?
नाही, भाकरी करा.	No, make *bhakri*.
आणखी काय ?	What else ?
लसणाची चटणी आणि कोबीची कोशिंबीर करा.	Make garlic chutney and cabbage salad.

This Vegetable Is Very Hot

ही भाजी फारच तिखट झालीय हो.	This vegetable is very hot.
तिखट अजिबात घालत जाऊ नका.	You shouldn't use any chili powder at all.
बरं.	All right.
तेल सुद्धा जास्त झालं आहे. अगदी थोडंसं तेल वापरायचं.	There is too much oil too. You should use only a little oil.
ही भाजी फारच तिखट झालीय. किती तिखट घातलं ?	This vegetable is very hot. How much chili powder did you use ?
एवढं.	This much.
बापरे. अगदी किंचित घालायचं. तेल सुद्धा अगदी थोडंसं वापरायचं.	Heavens ! You should use only a very little. And you should use only a little oil too.
ही भाजी फार तिखट झालीय हो.	This vegetable is very hot.
मिरच्या घातल्या का ?	Have you put in chilis ?
दोन घातल्या.	I put in two.
बापरे. मिरच्या अजिबात घालायच्या नाहीत.	Heavens ! You shouldn't put in chilis at all.
बरं, पुन्हा नाही घालणार.	All right, I won't put them in again.

Additional vocabulary

तेलकट oily
खारट salty
अळणी having too little salt
आंबट sour
गोड sweet
बेचव tasteless
छान very nice
मटनाचं कालवण mutton curry

Do You Have Any Eggs ?

तुमच्याकडे अंडी आहेत का ?	Do you have any eggs ?
नाही साहेब / बाई, सध्या कोंबड्या अंड्यावर बसवल्यायत.	No, saheb / bai. The hens are incubating (' hens have been seated on the eggs ').
मग मला अंडी कुठे मिळतील ?	Then where can I get some eggs ?
शेजारी चौकशी करा.	Ask next door.
तुमच्याकडे अंडी आहेत का ?	Do you have any eggs ?
आज नाहीत. कोंबड्या अंड्यावर बसवल्यायत.	None today. The hens are incubating.
असं का ? मग अंडी कोणाकडे मिळतील ?	Is that so ? Then where can I get eggs ?
शेजारी पाहा.	Go see next door.
तुमच्याकडे अंडी आहेत का ?	Do you have any eggs ?
एकच आहे साहेब / बाई.	Just one, saheb / bai.
एकच ? काय झालं ?	Just one ? What happened ?
कोंबड्या खुडुक बसल्यायत.	The hens are brooding.
असं का ? मग शेजारी अंडी मिळतील का ?	I see. Then can I get eggs next door ?
बहुतेक मिळतील. विचारा त्यांना.	Most probably. Ask them.

I Want To Take Leave Tomorrow

A manservant asks for leave.

मला उद्या रजा हवीय, साहेब / बाई.	I want leave tomorrow, saheb / bai.
कशाला ?	What for ?
माझ्या भावाचं लग्न आहे.	My brother's getting married.
किती दिवस पाहिजे ?	How many days' leave do you want ?
दोन दिवस.	Two days.
बरं ठीक आहे. पण पुढच्या वेळेला रजा हवी असेल तर निदान तीन-चार दिवस आधी मला सांगत जा.	Then it's OK. But after this if you want leave let me know three, four days in advance.
बरं साहेब / बाई, सांगत जाईन.	Yes, saheb / bai, I'll tell you in advance.

मला उद्या रजेवर जायचंय, साहेब/बाई.	I want to go on leave tomorrow, saheb/bai.
का ?	What for ?
मला देवाला जायचं आहे.	I want to go on a pilgrimage.
किती दिवस रजा पाहिजे ?	How many days' leave do you want ?
दोन दिवस.	Two days.

(Cont.)

बरं जा. पण पुन्हा रजा मागताना निदान तीन-चार दिवस आधी मागत जा.	Then it's all right. But next time you ask for a leave you should ask at least three, four days in advance.
ठीक आहे साहेब / बाई.	All right, saheb/bai.
मला उद्या रजा पाहिजेय साहेब / बाई.	I want leave tomorrow, saheb / bai.
का ?	What for ?
माझ्या बहिणीला सासरी पोचवायचंय.	To take my sister back to her in–laws.
उद्या आपल्याला खूप काम आहे. तुम्ही परवा गेला तर नाही का चालणार ?	Tomorrow we have a lot of work. Couldn't you go the day after tomorrow ?
ठीक आहे, साहेब / बाई. परवा जातो.	All right, saheb/bai. I'll go the day after tomorrow.

PRACTICE

A. Translate the following sentences.

1. I've found two rooms.
2. There's a bathroom and a toilet.
3. I eat in a restaurant.
4. Can I get meals sent to my house ?
5. I need a cook. Do you know anybody ?
6. We'll have to get the wheat ground.
7. What vegetables do we have ?

8. Make *poli*, potato curry, and carrot salad.
9. Make rice, *amti*, and cucumber salad.
10. Always use only a little chili powder.
11. How many days' leave do you want?

B. Form groups of two, one person taking the part of an employer and the other of a prospective cook. Conduct the interview and try to come to an agreement on work, salary, etc.

C. Tell the cook to prepare the following.

१. भाकरी, आमटी, लसणाची चटणी
२. बट्ट्याची भाजी, पोळी, मुळ्याची कोशिंबीर
३. भात, साधं वरण, काकडीची कोशिंबीर
४. आमटी, तांदुळजाची भाजी, पोळी

D. Tell the cook to do the following.

1. Bring five kilos of wheat.
2. Have one kilo of wheat ground.
3. Bring one kilo of sugar.
4. Bring a leafy vegetable, carrots, cauliflower, and peas.

Additional practice

Kavadi and Southworth, conversations 26 a–b, 30 a, 31 b, 41 a–b.

Thirteen

MEETING FARMERS

How Much Land Do You Have?

तुमची किती जमीन आहे ?	How much land do you have ?
वीस एकर.	Twenty acres.
सगळी पाण्याखाली आहे का ?	Is it all irrigated ?
नाय नाय. दोन एकर पाण्याखाली, बाकीची कोरडवाहू आहे.	No, No. Two acres are irrigated, the rest are dry.
तुमची किती शेती आहे ?	How much land do you have ?
यीस एकर.	Twenty acres.
सगळी बागाईत आहे का ?	Is it all irrigated ?
नाय, दोन एकर बागाईत आहे, बाकीची जिराईत.	No, there are two acres of irrigated land, the rest dry.
तुमची किती जमीन आहे ?	How much land do you have ?
वीस एकर.	Twenty acres.
सगळी पाण्याखाली आहे ?	Is it all irrigated ?
सगळी कुठं ? दोन एकर. बाकीची जिराईत.	How can it all be ? Two acres. The rest is dry.

ही जमीन तुमची आहे का ?	Is this land yours ?
हो, माझी आहे.	Yes, it's mine.
छान आहे, किती एकर आहे ?	Very nice. How many acres is it ?
वीस एकर. दोन एकर बागाईत, बाकीची जिराईत.	Twenty acres. Two irrigated, the rest dry.
ही शेती तुमची आहे का ?	Is this your land ?
हो, माझीच आहे.	Yes, it's mine.
छान आहे. किती आहे ?	Very nice. How much land is it ?
वीस एकर.	Twenty acres.
त्यातली पाण्याखाली किती ?	And how much of it is irrigated ?
दोन एकर.	Two acres.

What Do You Raise?

तुम्ही काय लावता ?	What do you raise ?
ऊस, कपाशी.	Sugarcane, cotton.
ज्वारी सुद्धा लावता का ?	Do you raise jawar too ?
हो, थोडी.	Yes, a little.
हायब्रिड आहे का ?	Is it hybrid ?
नाय, देशी.	No, *deshi*.[1]

तुम्ही काय काय लावता ?	What all do you raise ?
गहू, ज्वारी, बाजरी.	Wheat, jawar, bajra.
बाजरी हायब्रिडची का ?	Is the bajra hybrid ?
नाही, देशी.	No, *deshi*.

काय पिकं करता तुम्ही ?	What crops do you raise ?
ऊस, द्राक्षं.	Sugarcane, grapes.
ज्वारी पण करता का ?	Do you raise jawar too ?
फक्त घरी खायला.	Only for ourselves.
हायब्रिड नाही लावत ?	You don't raise hybrid ?
नाय, देशी.	No, *deshi*.

यंदा कोणती पिकं घेतली तुम्ही ?	Which crops have you planted this year ?
ज्वारी, हरभरा, मिरची.	Jawar, gram, peppers.
करडी ?	Safflower ?
करडी यंदा नाय लावली.	No, this year I haven't planted safflower

Note

[1] a local, unimproved variety

How's the Rain This Year?

यंदा पाऊस कसा काय ?	How's the rain this year ?
दोन पाऊस चांगले झालेत. भरपूर ओल झाली आहे.	There've been two good rains. The soil is good and wet.
ज्वारीची पेरणी केली का ?	Have you planted your jawar yet ?
नाही, आता वाप्सावर करणार.	No, we're going to sow when the soil is dry enough.
यंदा पीक पाणी कसं काय ?	How's the rain this year ?
काही विशेष पाऊस नाही. मिरग लागायचाय दोन तीन दिवसांत. तेव्हा पाऊस पडेल.	Nothing much. *Mrig*[1] will be here in a couple of days. Then it'll rain.
यंदा पाऊस काय म्हणतो ?	How's the rain this year ?
ह्या वर्षी काहीच पाऊस नाही.	This year there's been no rain.
देवाला पाण्यात ठेवला तरी पाऊस पडला नाही.	Even though we put the god into water no rain came.[2]
आता कोकणात पाऊस झाला आहे. इथे येईल दहा पंधरा दिवसांत.	The monsoon has reached the Konkan now. It will be here in ten-fifteen days.

यंदा पाऊस पाणी कसं काय ?	How's the rain this year ?
पाऊस अजिबात झाला नाही.	There hasn't been a bit of rain.
म्हणजे पेरणी झालीच नाही अजून ?	So you still haven't done any planting ?
नाही. प्यायला सुद्धा पाणी नाही. मग पिकाला द्यायला कुठलं ?	No. There's not enough water to drink, so how can there be enough for the crops ?

Notes

[1] The entrance of the moon into the mansion of the star मृग (मृग नक्षत्र) in about the first week of June is considered the beginning of the monsoon.

[2] When the monsoon is very late some people immerse a god's image in water in order to make the rains come.

Why Don't You Raise Hybrid Jawar ?

तुम्ही हायब्रिड ज्वारी का लावत नाही ?	Why don't you raise hybrid jawar ?
आपल्याला नाही हायब्रिड पसंत.	I don't like hybrid.
का ?	Why ?
एक तर वैरण कमी होते. ती बी जनावरं खात नाहीत. अन् धान्य बी खायला चांगलं नाही.	For one thing, it doesn't give much fodder. And even that the animals don't eat. Besides the grain doesn't taste good.
संकरित ज्वारी तुम्हाला आवडत नाही का ?	Don't you like hybrid jawar ?
नाही.	No.
का ?	Why not ?
चव नाय त्याला. अन् त्याची वैरण जनावरांना आवडत नाय.	It doesn't have any taste. And the animals don't like the fodder.
हायब्रिड ज्वारी तुम्ही का लावत नाही ?	Why don't you raise hybrid jawar ?
नको बाबा. हायब्रिड म्हणजे लई तरास.[1]	No, sir. Raising hybrid means a lot of trouble.

(*Cont.*)

त्रास का ?	Why trouble ?
कीड पडली तर सबंध पिकाचं नुकसान होतं.	If insects attack the whole crop is ruined.
इथले लोक हायब्रिड ज्वारी का नाही लावत ? त्याचं उत्पन्न फार चांगलं येतं.	Why don't people here raise hybrid jawar ? Its yield is very good.
हो, चांगलं आलं तर फार चांगलं. रोग आला तर सगळी खलास.	Yes, if it's good, it's very good. If disease attacks the whole thing is shot.

Note

[1] In the speech of uneducated people initial consonant clusters are often broken up either by the insertion of a vowel or by the dropping of one member of the cluster. Thus speakers say तरास for त्रास.

Do You Have a Well?

विहीर आहे का तुमच्याकडे ?	Do you have a well ?
विहीर नाही, कॅनॉलचं पाणी मिळतं.	Not a well. We get canal water.
तुमच्याकडं कॅनॉलचं पाणी मिळतं का ?	Do you get canal water ?
नाही, विहीर आहे.	No, I have a well.
तुम्हाला कशाचं पाणी मिळतं ?	What water do you get ? Well
विहिरीचं की कालव्याचं ?	water or canal ?
विहिरीचं.	Well.
तुम्ही नदीचं पाणी वापरता का ?	Do you use river water ?
हो, लिफ्ट आहे.	Yes, I've got a lift (I lift water.)
विहीर आहे का तुमच्याकडे ?	Do you have a well ?
नाई, आम्ही नदीचं पाणी घेतो.	No, we use river water.
कसं ?	How's that ?
आमची लिफ्ट इरिगेशन स्कीम आहे.	We have a lift irrigation scheme.[1]

कॅनॉलचं पाणी तुम्हाला मिळतं का ?	Do you get canal water ?
नाई, नदीचं.	No, river.
असं, म्हणजे पंपानं घेता का ?	Is that so ? You mean you take it with a pump ?
हो, नं. आमची मोठी लिफ्ट इरिगेशनची योजना आहे.	Yes. We have a big lift irrigation scheme.

Note

[1] In some places where the water source is below the level of the fields to be irrigated, villagers have joined together to have the water pumped up and distributed by channels to each field.

Why Don't You Dig a Well?

इथे पाणी चांगलं लागेल. तुम्ही विहीर का नाही खणत ?	You'll get a lot of water here. Why don't you dig a well ?
विहिरीसाठी पैसे नकोत का ?	You need money for that.
बँकेकडून तुम्हाला कर्ज मिळेल.	You can get a loan from the bank.
आमच्यासारख्या गरीब लोकांना कर्ज कोण देणार साहेब / बाई ?	Who's going to give a loan to poor people like us, saheb/bai ?
असं म्हणू नका. अर्जाचा फॉर्म आणा. तो भरायला मी तुम्हाला मदत करतो / करते.	Don't say that. You get an application form. I'll help you fill it out.
इथे चांगलं पाणी लागेल.	You'll get a lot of water here.
तुम्ही विहीर का खोदत नाही ?	Why don't you dig a well ?
तेवढे पैसे माझ्याजवळ नाहीत, साहेब / बाई.	I don't have that much money, saheb/bai.
पण बँकेकडनं तुम्हाला कर्ज मिळेल.	But you can get a loan from the bank.
श्रीमंत लोकांना पैसे देतात. आमच्या-सारख्या गरीब लोकांना ते देत नाहीत.	They give money to rich people. They don't give money to poor people like us.

(Cont.)

असं मुळीच नाही. तुम्ही फॉर्म आणा. तो कसा भरायचा मी तुम्हाला दाखवतो / दाखवते.

That's not the case at all. You get a form. I'll show you how to fill it out.

इथे चांगलं पाणी लागेल.

You'll get a lot of water here.

तुम्ही विहीर का काढत नाही ?

Why don't you dig a well ?

विहीर काढायला खूप पैसे लागतात, साहेब / बाई.

It takes a lot of money to dig a well, saheb / bai.

बँकेकडनं तुम्हाला कर्ज मिळेल ना.

But you can get a loan from the bank.

नाही, साहेब / बाई. वशिल्याशिवाय लोकांना कर्ज मिळत नाही.

No, saheb / bai. People don't get loans without influence.

असं मुळीच नाही. तुम्ही फॉर्म आणा. तो भरा. मग मी तुम्हाला कर्ज मिळवून द्यायला मदत करतो / करते.

That's not the case at all. You bring a form and fill it out. Then I'll help to get you a loan.

✣

What Did You Make on Your Sugarcane ?

तुम्ही कुठलं नगदी पीक लावता का ?	Do you plant any cash crop ?
हो, ऊस लावतो की.	Sure, I plant sugarcane.
किती एकर आहे ?	How many acres do you have ?
पाच एकर.	Five acres.
काही लोक म्हणतात की उसाचा भाव शेतकऱ्यांना परवडत नाही. हे खरं का ?	Some people say that the price of sugarcane is too low for farmers to make a profit.[1] Is that true ?
अगदी खरं.	Quite true.
मागच्या सीझनमधे तुमचा ऊस किती पडला ?	Last season what was your sugarcane yield ?
पडला एकरी पन्नास टन.	I got fifty tons[2] per acre.
आणि त्याचा भाव काय मिळाला कारखान्याकडनं ?	And what price did you get for it from the factory ?
एकशेसत्तर मिळाला. पण अजून सगळे पैसे हातात आले नाही.	One hundred seventy.[3] But I still haven't received all the money.
म्हणजे एकरी साधारण साडे आठ हजार रुपये मिळाले.	So you've gotten about eight and a half thousand per acre.

(*Cont.*)

पण एकरी खर्च खूप वाढलाय आता. खताच्या किमती वाढल्यायत, मजुरी वाढलीय.

But the cost per acre has gone way up now. The prices of fertilizer have gone up, the cost of labor has gone up.

किती येतो खर्च ?

What does the cost come to ?

तसा काही मी हिशोब ठेवला नाही, पण तीन हजाराच्या आतबाहेर असेल.

Actually I haven't kept accounts, but it must be about three thousand.

तरी एकरी पाच-साडेपाच हजार रुपये झाले की तुमचे.

Still, you've made about five or five and a half thousand per acre.

हे अठरा महिन्यांचं पीक आहे म्हणजे वर्षाला किती नफा पडतो बघा की. शिवाय, यंदा उत्पन्न बरं आहे, म्हणून एवढे तरी पैसे झाले. पुष्कळ शेतकऱ्यांना वीस-तीस टनांच्यावर मिळत नाही, त्यांच्या पदरात काय पडत असेल बघा. त्यापेक्षा बँकेत पैसे व्याजी लावले तरी बरे पैसे होतील.

This is an eighteen-month crop, so see how much profit there is per year. Besides, the yield this year was good so I got at least this much money. Many farmers never get more than twenty or thirty tons; think how much they must make. Instead of that you'd do better putting your money at interest in a bank.

Additional sentences

एकरी / हेक्टरी तुमचं सरासरी उत्पन्न किती आहे ?

What is your average yield per acre / hectare ?

सगळा खर्च वजा जाता किती पैसे मिळतात ?

Subtracting all costs, how much do you make ?

तुम्ही सहकारी सोसायटीकडनं कर्ज काढलं का ?	Did you take a loan from the cooperative society ?

Notes

[1]See Nimbkar and Berntsen, pp. 73–76 for information on the farmer's movement for higher prices.

[2]These are metric tons, i.e. 1,000 kilograms.

[3]This is the price per ton.

PRACTICE

A. Translate the following sentences.

1. How much land do you have ?
2. How much of it is irrigated ?
3. How much of it is rainfed ?
4. What do you raise ?
5. Do you raise sugarcane ?
6. How's the rain this year ?
7. Have you planted your jawar yet ?
8. Why don't you raise hybrid jawar ?
9. Do you get canal water ?
10. You can get a loan from the bank.
11. Do you have a tractor ?

B. If you have experience of farming tell about your farm — what you raise, source of water, etc. Otherwise, tell about farming in your country/state.

Fourteen

MEETING OFFICIALS

Is Saheb in the Office?

साहेब आहेत का ?	Is Saheb in the office ?
नाही, ते गावाला गेलेत.	No, he's gone out of town.
ते परत केव्हा येणार आहेत ?	When is he coming back ?
उद्या सकाळी येतील.	He'll come back tomorrow morning.
मी उद्या त्यांना भेटायला येऊ का ?	Shall I come to see him tomorrow ?
हो, या की.	Yes, certainly.

साहेब आहेत का ?	Is Saheb here ?
नाही, ते बाहेर गेलेत. येतील थोड्या वेळानी.	No, he's gone out. He'll be back in a short time.
मी इथे थांबू का ?	Shall I wait here ?
हो, थांबा की.	Certainly, go ahead.

साहेब आहेत का ?	Is Saheb here ?
नाही, ते फिरतीवर गेलेत.	No, he's gone on tour.
असं का ? ते केव्हा परत येतील ?	I see. When will he be back ?
उद्या परवा येतील.	He'll come back tomorrow or the day after.

(Cont.)

ते आल्यावर मला कळवाल का ?	Will you let me know when he gets back ?
हो, कळवीन.	Yes, I'll let you know.
साहेब आहेत का ?	Is Saheb here ?
नाही, ते परगावला गेलेत.	No, he's gone out of town.
ते केव्हा परत येणार आहेत ?	When is he coming back ?
आज रात्री.	Tonight.
बरं. उद्या मी परत येऊ का ?	Well, shall I come back to-morrow ?
हो. या की.	Yes, do.
साहेब इथे नाहीत का ?	Saheb isn't here ?
नाही, ते बाहेर गेलेत. येतील थोड्या वेळानी.	No, he's gone out. He'll be back in a short time.
मी इथे थांबलो / थांबले तर चालेल का ?	Will it be all right if I wait here ?
जरूर.	Certainly.

I Want Permission To Visit Some Schools

A scholar approaches the Education Department for permission to visit some schools.

मला काही शाळांना भेट द्यायला परवानगी पाहिजे.	I want permission to visit some schools.
तुम्हाला अर्ज करावा लागेल.	You'll have to make an application.
अर्जाचा फॉर्म तुमच्याकडे आहे का ?	Do you have an application form ?
नाही, साध्या कागदावर केला तरी चालेल.	No, it will be all right if you make it on plain paper.

Scholar completes the application and gives it.

हा घ्या अर्ज. हा मंजूर झाला आहे की नाही हे मला केव्हा कळेल ?	Here is the application. When will I know if it's approved or not ?
सोमवारी या. बहुतेक तोपर्यंत कळेल.	Come on Monday. Most probably by that time we will know.

Scholar returns on Monday.

मी मागच्या आठवड्यात शाळांना भेट द्यायला परवानगी मिळावी म्हणून अर्ज केला होता. तो मंजूर झाला आहे का ?	Last week I made an application for permission to visit some schools. Has it been approved ?
हो, झाला आहे. हे पत्र घेऊन प्रिन्सिपॉलांना दाखवा.	Yes, it has. Take this letter and show it to the principals.

✣

I Want a Spirit License

Bureaucratic procedures are likely to be baffling and frustrating to the uninitiated. The following exchange in the office of the tahsildar[1] between an applicant for a spirit license[2] and a clerk illustrates some of the procedures.

मला स्पिरिट लायसेन्स पाहिजेय.	I want a spirit license.
कशाकरता ?	For what ?
घरगुती उपयोगासाठी.	For domestic purposes.
तुम्हाला अर्ज करावा लागेल.	You'll have to make an application.
अर्जाचा फॉर्म तुमच्याकडे आहे का?	Do you have an application form ?
नाही, प्रिस्क्राइब्ड फॉर्म नाहीये.	No, there's no prescribed form.
साध्या कागदावर अर्ज लिहा.	Write the application on plain paper.

Applicant writes letter and hands it to clerk.

हा पाहा अर्ज.	Here is the application.
ह्याच्यावर पासष्ठ पैशांचं तिकीट लावायला पाहिजे.	You'll have to put a sixty-five paise court fee stamp on this.
ते कुठे मिळेल ?	Where do I get that ?
बाहेर ते स्टँप व्हेंडर बसले आहेत ना, त्यांच्याकडे मिळेल.	Those stamp vendors are sitting outside you know — you'll get it from them.

Applicant brings stamp and clerk affixes it to application.

आता काय करू ?	Now what do I do ?
आता ट्रेझरीमधे दीड रुपया भरायचा. त्यासाठी पहिल्यांदा ही तीन चलनं भरावी लागतील.	Now you have to pay Rs. 1.50 into the Treasury. For that you first have to fill out challans.[3]

Applicant looks at challan.

हेड ऑफ अकौंट काय आहे ?	What is the heading of the account ?
झीरो एकोणचाळीस स्टेट एक्साइज.	039 State Excise.

Applicant gives completed challans to clerk who signs them and returns them.

बरं, ही चलनं घेऊन स्टेट बँकेत जाऊन पैसे भरा. पावती म्हणून ते एक कॉपी तुम्हाला परत देतील. ती तुम्ही इकडे आणा. मग एक-दोन दिवसांनी लायसेन्स मिळेल.	OK, take these challans and go to the State Bank and pay the money. They'll give you back one copy as a receipt. Bring that here. Then you will get your license in a day or two.
बरं, मी लगेच जाऊन येतो /येते.	All right, I will go right away.
आज जाऊन काही उपयोग नाही. आता तीन वाजून गेले म्हणून बँक बंद झाली असेल. उद्या जा.	There's no use in going today. It's past three so the bank must be closed. Go tomorrow.

Notes

[1] The *tahsildar* (or *mamlatdar*) is a taluka-level revenue officer.

[2] Methylated spirit is used by some people for lighting a pressure kerosene stove. As the sale of spirit is regulated by the government, the user is required to get a license.

[3] A challan is a record of a payment or transfer of goods.

PRACTICE

A. Translate the following sentences.

1. Is Saheb here?
2. When will he be back?
3. May I wait here?
4. I'll phone tomorrow and inquire.
5. I want a driver's license.
6. I want to apply for a ration card. Is there a prescribed form?
7. Where shall I sign?
8. Do I have to put a court fee stamp on this?
9. How much money do I have to pay into the Treasury?
10. Has my application been approved?

B. Form groups of two, one taking the part of an applicant and the other of a government clerk. Do the following scenes.

1. applying for a driver's license
2. applying for a ration card
3. applying for permission to visit schools
4. requesting information on school enrollments

This book is an elementary Marathi conversation text for adult learners of Marathi, both foreign and Indian.

This volume is the second in the authors' set of elementary Marathi teaching materials. It is designed to be used in conjunction with their *Marathi Structural Patterns, Book One* and their *Marathi Vocabulary Manual.*

As its name implies, this volume presents the conversational material required in everyday situations — such as getting acquainted, getting around, shopping, etc. Each basic conversation is presented with a number of variations so that the student can develop a repertoire of opening sentences and responses for each situation. Along with these basic conversations some more difficult conversations have also been included to lead the student to a higher level of mastery.

Each section of the book is independent. Thus students can select the conversations relevant to their needs.

American Institute of Indian Studies, New Delh